"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३
WEB SITE : http://www.nkgsbsangh.org
E-MAIL : nkgsbs@gmail.com
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। वरं जनहितं ध्येयम् न केवला जनःस्तुतिः।।

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ

मूल्य रु. ५

| क्रमांक २ | वर्ष : ४० | जुलै–सप्टेंबर २०१८ |
|---|---|---|

BOOK POST
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

TO,

From : The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## ठाणे मंच आयोजित 'सुरभी'

### (विविध गाण्यांची मैफल)

'सुरभी' हा विविध गाण्यांचा कार्यक्रम साधारण नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात ठाणे येथे आयोजित करण्याचा मानस आहे. आपल्या समाजातील प्रसिद्ध गायक/गायिका श्री. शशांक मोहन दिवेकर, पुणे व सौ. स्मिता उदय वाघ, मुलुंड यांचा या कार्यक्रमात सहभाग असेल. त्यांच्या सोबतीला उदयोन्मुख गायक श्री गौरांग तेलंग, गोरेगांव यांचा पण सहभाग असेल.

* समाजातील उत्तम प्रतीचे गाणे म्हणणाऱ्यांनाही भाग घेण्याची संधी मिळेल.
* ठाण्यातील कार्यक्रम यशस्वी झाल्यास व प्रायोजक मिळाल्यास मुंबई व पुणे येथे हा कार्यक्रम करण्याचा विचार आहे.

आपला आर्थिक सहभाग स्फूर्तीदायक ठरेल.

* इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

| सुरेश पालेकर | मंजिरी कुलकर्णी |
|---|---|
| ९९६९४५५३७० | ९६६५०९८११७ |

## विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही २५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात २०१८ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलिफोन नंबर ३० सप्टेंबर २०१८ पर्यंत संघाच्या पत्त्यावर पाठवून किंवा टेलिफोनवर कळवून आम्हांला उपकृत करावे.

*१ ऑक्टोबर नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची कृपया दखल घ्यावी.*

## संपादकीय

# मुखपत्रिकेला चाळीस वर्षे

दर तीन महिन्यांनी आपले ज्ञातिबांधव ज्याची आतुरतेने वाट बघतात त्या मुखपत्रिकेचा पहिला अंक ऑगस्ट १९७८ मध्ये प्रसिद्ध झाला होता. या घटनेला आता चाळीस वर्षे झाली. याची संपादकीय धुरा मी पूर्ण चाळीस वर्षे वाहत आहे. या कालावधीत अनेक बरेवाईट अनुभव आले. पण कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन या गीतेतील उक्तीनुसार ज्ञातीची थोडी फार सेवा करण्याची मला संधी मिळाली हेच माझं समाधान आहे.

गेल्या शतकाच्या सुरुवातीला आपले ज्ञातिबांधव कारवारच्या परिसरातून मुंबईत येऊ लागले तेव्हा ते गिरगावातच केंद्रीत झाले. त्यांचे बालपण कारवारच्या आजुबाजूला गेल्यामुळे मुंबईसारख्या परगांवात आल्यावर भावनिक सुरक्षेसाठी संघटीत होणे आवश्यक वाटले व त्यातूनच संघाचा जन्म झाला. संघ कार्यालय हे एक सांस्कृतिक व सामाजिक केंद्र बनले. ज्ञाती संबंधीत घटना आपोआप पांचामुखी होऊन सर्वांना समजत असत व सुखदु:खाच्या भावना शेअर करण्याची गरज भागत असे. कालांतराने बहुतेकांचे स्थलांतर उपनगरात झाले व ते सर्वत्र विखुरले गेले. या सर्वांशी संवाद व संपर्क साधण्याची गरज भासली व त्यातूनच मुखपत्रिकेचा जन्म झाला. व हा उपक्रम यशस्वीही झाला. मुखपत्रिकेची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्यात देणगीदारांची यादी प्रसिद्ध करण्याच्या प्रथेमुळे संघ व एज्युकेशन सोसायटीला मिळणाऱ्या देणग्यांचा ओघ. यांमुळे गरजूंना व निराश्रितांना मिळणारे आर्थिक साहाय्य सतत वाढविता आले.

माझे वय आता ८१ एवढे आहे. वयोमानानुसार काही मर्यादा येतातच. आम्ही सर्व हा कार्यभार उचलणाऱ्या पर्यायी व्यक्तीच्या शोधात आहोत.

द. ना. कारकर्णी

## हळदीकुंकू समारंभ : भगिनींस निमंत्रण

**नेहमीचा श्रावणातला हळदीकुंकू समारंभ यंदा जोगेश्वरी व मुलुंड येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य उपस्थित राहावे.**

**जोगेश्वरी**

तारीख : शुक्रवार ७ सप्टेंबर
स्थळ : रामेश्वर मंदीर सरस्वतीबाग, जोगेश्वरी (पू)
वेळ : संध्याकाळी ५ ते ७

संघ कार्यकारिणी तर्फे
जयश्री भेडसगांवकर, शांता पालेकर

**मुलुंड**

शुक्रवार १८ ऑगस्ट
सौ. वृंदा दिवेकर यांच्या घरी ५०१, श्री गुरुकृपा, मालती भवनच्या मागे, आर. एच. बी. रोड, मुलुंड (प.)
संध्याकाळी : ५ ते ७

ठाणे मंच कार्यकारिणी तर्फे
वृंदा दिवेकर मंजिरी कुलकर्णी



# एज्युकेशन सोसायटी : गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे

दरवर्षी ज्ञातीच्या स्नेहसंमेलनांत ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षिसे दिली जातात. त्यानुसार यंदाही २५ नोव्हेंबर २०१८ रोजी भरणाऱ्या स्नेहसंमेलनांत बक्षिसे दिली जातील. बक्षिसांची पात्रता पुढील प्रमाणे :

| परीक्षा | किमान पात्रता |
|---|---|
| दहावी | ८०% |
| बारावी – विज्ञान (वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश घेतला असेल तर अर्जात तसे नमूद करावे.) | ७५% |
| वाणिज्य | ७०% |
| कला | ६५% |
| पदवी व सरकारमान्य डिप्लोमा | ६०% |
| एम.ए., एम.कॉम, एम.एस्सी. पीएच.डी, वैद्यकीय क्षेत्रातील पदवी एम.बी.ए., सी.ए., कॉस्ट अकौंटस, कंपनी सेक्रेटरी, पदव्युत्तर डिप्लोमा इत्यादी, | उत्तीर्ण |
| परदेशांत घेतलेली पदवी | ए ग्रेड |

तसेच किमान राज्य पातळीवरील क्रीडास्पर्धेत ज्यांना पदके मिळाली असतील किंवा जे स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाले असतील तर संबंधितांनी त्याचाही तपशील पाठवावा. कार्यकारिणी अशाही अर्जांचा विचार करील.

## अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख १ ऑक्टोबर २०१८

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पत्रिकेची प्रत (झेरॉक्स), टेलीफोन नंबर, Email व संपूर्ण पत्ता. The NKGSB Ind & Education Society, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai 400004. या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

- ☐ विद्यार्थ्याच्या वडिलांचे मूळ गांव उत्तर कानडांत असावे व ते स्मार्त कवळे मठानुयायी असावेत किंवा आई माहेरच्या तिथल्या असून सारस्वत पोटजातीतील गृहस्थाशी विवाहबद्ध असल्या पाहिजेत.
- ☐ बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी एम.बी.बी.एस., जर्नेलिझम किंवा बी.कॉम. शाखेत प्रवेश घेतल्यास तसे नमूद करावे.
- ☐ ज्या डॉक्टर्सनी एम्.एस्. किंवा एम्.डी. साठी प्रवेश घेतला आहे, त्यांनाही काही पुरस्कृत बक्षिसे आहेत. संबंधितांनी याचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावे.
- ☐ गेल्या वर्षी काही परीक्षांचा निकाल उशिरा लागला होता. तेव्हा संबंधित गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनीही अर्ज पाठवावे.

## प्रकाश झोत

### सौ. शैला नाडकर्णी ह्यांचा अनोखा सत्कार

सुमारे पावणेदोनशे वर्षांपूर्वी बेळगांवमधील वेणूग्रामी प.पू. स्वामीदास रंगय्या नायडू याना श्री स्वामी समर्थांनी स्वहस्ते दिलेल्या आपल्या हातातील इंद्रनील मणी, श्री सिद्धहस्तकमल पादुका आणि पंचमुखी गणपती यांचे त्यांच्या 'मनमंदीर' ह्या राहत्या निवासस्थानापासून 'श्री दत्त-त्रिपूर सुंदरी मठ' ह्या नूतन वास्तूत नववर्षाच्या शुभ मुहूर्तावर स्थलांतर झाले. त्यावेळी ता. १० मार्च पासून १९ मार्च २०१८ पर्यंत चाललेल्या ह्या अमृतमय आनंद सोहळ्यात महाराष्ट्र कोंकण, गोवा, कारवार आणि कर्नाटकमधील चार-पाच हजार भाविकांचा सहभाग होता.

'श्री दत्त त्रिपूर सुंदरी मठ' संपूर्णपणे प्राचीन कालीन मंदीर बांधणीवर म्हणजे पूर्ण गर्भसंस्कारानी युक्त अशा धर्तीवर बांधलेला असून मठामधील एकमुखी श्री दत्तगुरूंची बालपणातील मूर्ती अत्यंत चैतन्यमय, लोभस आणि मन भारावून टाकणारी आहे. एकमुखी श्री दत्तगुरुंचा हा कर्नाटकामधील पहिलाच मठ आहे. नायडू घराण्याच्या सातव्या पिढीतील वारस श्री. किरणस्वामी ह्यांनी ह्या मठबांधीणीसाठी गेली तीन-चार वर्षे अथक परिश्रम घेतले.

दि. १४ आणि १५ मार्च २०१८ रोजी श्री मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आणि कळसारोहण सोहळा श्रीमद् जगद्गुरु श्री शंकराचार्य संस्थान मठ, संकेश्वर करवीर ह्यांच्या हस्ते पार पडला. ह्यावेळी सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि कला क्षेत्रामधील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. ह्या शुभमुहूर्तावर दहा आदरणीय व्यक्तींची पाद्यपूजा करून संत आणि सद्गुरु अशा पदांनी संबोधून तुतारीच्या निनादात विशेष सन्मान करण्यात आला. ह्या दहा आदरणीय व्यक्तीमध्ये सौ. शैला नाडकर्णी, माहीम, (आपल्या संघ आणि एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष, श्री प्रेमानंद नाडकर्णी ह्यांच्या सुविद्य पत्नी) ह्यांचा समावेश होता.

सौ. शैलाताई ह्या साक्षात्कारी, श्री गायत्री देवी अनुष्ठानी आणि दत्तसंप्रदायाच्या अधिकारी व्यक्ती असून मानसशास्त्र, स्वरोदयशास्त्र, वास्तूशास्त्र, निसर्गोपचार, योग, ज्योतिषी आणि वैश्विक शक्तीच्या अनेक विषयांवर त्यांचे सखोल प्रभूत्व आहे. त्यांच्या ह्या निरपेक्ष आध्यात्मिक सेवेचा लाभ शेकडो लोकांनी विशेषत: विद्यार्थी वर्गाने आजवर घेतलेला आहे. ह्या विषयांवरील त्यांचे लिखाणही बरेच आहे.

आपल्या GSB ज्ञातीत संत-सद्गुरु पद प्राप्त झालेल्यांची संख्या अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी आहे. सौ. शैलाताईंचा हा संत-सद्गुरु सन्मान म्हणजे त्यांच्या निरलस कार्याचा मठाधिपतीनी केलेला बहुमान आहे. आपल्या आध्यात्मिक ज्ञानाचा उपयोग आपल्या ज्ञातिबांधवांना अधिकाधिक व्हावा असे त्यांना वाटते.



### श्री माधव देसाई लिखित CHITTAKULA KARWAR-A HISTORY या संदर्भ ग्रंथाचे पुनर्प्रकाशन

चित्ताकुला-कारवार येथील परिसर ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत समृद्ध आहे. ब्रिटिश व्यापाऱ्यांनी सुमारे चारशे वर्षापूर्वी स्थापन केलेली वखार, तीनशे वर्षांपूर्वी सोंदेकरांनी बांधलेला सदाशिवगडचा किल्ला, सतराव्या शतकात सदाशिवगड येथे बांधलेला शाह करामुद्दीनचा दर्गा, चारशे वर्षे पोर्तुगीजाच्या ताब्यात असलेले आजाद्वीप बेट, अरबी महासागरात भ्रमण करणाऱ्या नावाड्यांची निशाणी असलेला देवगडचा दीपस्तंभ, छत्रपती शिवाजी महाराजांची भेट अशा जुन्या संदर्भाची या परिसराला पार्श्वभूमी आहे. बैतखोलचे बंदर हे नैसर्गिक मोक्याचे ठिकाण असल्याने इंग्लीश, फ्रेंच, डच, पोर्तुगीज व्यापारांचा तेथे पाय रोवण्यासाठी सतत संघर्ष होत असे. या प्रदेशावर कदंब, विजापूरचे आदिलशहा, हैदर-टिपू, सोंदेकर व शेवटी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अंमल गाजविला. या बहुतेकाची माहिती कारवार जिल्ह्याच्या गॅझेटीयरमध्ये असली तरी ती तुटपुंजी आहे. कै. माधव अनंत देसाई यांनी या संबंधात विस्तृत माहिती घेण्यासाठी सखोल संशोधन केले. पुराभिलेख संग्रहातील जुन्या कागदपत्रांचा शोध घेतला. अनेक दुर्मिळ पुस्तकांचा अभ्यास केला व मग १९६५ साली CHITTAKULA KARWAR-A HISTORY हा एक अत्यंत मौल्यवान ग्रंथ प्रकाशित केला. यात अनेक दुर्मिळ छायाचित्रे व नकाशे आहेत.

हे मौल्यवान पुस्तक बरीच वर्षे उपलब्ध नव्हते. कारवारचे एक इतिहासप्रेमी सिव्हील इंजिनियर श्री कृष्णानंद बांदेकर यांनी आपल्या मुखपत्रिकेचे संपादक श्री. द. ना. नाडकर्णी यांच्या साहाय्याने अलीकडेच या पुस्तकाचे पुनर्प्रकाशन केले व कारवारप्रेमी रसिकांची सोय करून दिली.

(CHITTAKULA KARWAR-A HISTORY मूल्य रु. २५०
उपलब्ध : द. ना. नाडकर्णी, पारले ०२२-२६१२४१६२)

### इतिहासाचार्य धुमें लिखित 'गोमंतक ज्ञानदीप' पुस्तकाचे प्रकाशन

गोमंतक प्रदेश म्हणजे देवभूमी अर्थात् पुण्यभूमी असे समीकरणच होय. स्वच्छ व निसर्गरम्य परिसरांनी डोळ्याची पारणे मिटविणारी मंदिरे हे गोमंतकाचे वैशिष्ट्य आहे.

अशा या देवभूमीला धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, पौराणिक व ऐतिहासिक अधिष्ठान आहे. इतिहास संशोधनासाठी उभी हयात वेचणारे गोमंतकांतील हिंदु मंदिरांचा चालता बोलता कोश म्हणजे दिवंगत इतिहासाचार्य विनायक नारायण शेणवी धुमें यांनी अपरंपार कष्ट घेऊन गोमंतकीय मंदिरावर ३५ पुस्तके लिहिली आहेत. त्यातील 'देवभूमी गोमंतक' व 'पुण्यभूमी गोमंतक' या दोन पुस्तकांत आणखी अनेक मंदिरांची माहिती दिली आहे. त्याशिवाय श्री. धुमें यांनी स्थानिक वृत्तपत्रांत, दिवाळी अंकात व स्मरणिकांमधून गोमंतकाच्या इतिहासासंबंधात अनेक लेख लिहिले होते. ते लेख काळाच्या उदरांत गडप होण्यापूर्वी श्री. धुमें यांचे निस्सीम चाहते विलेपारले येथील श्री. द. ना. नाडकर्णी यांनी ते विखुरलेले लेख एकत्र करून पुस्तक रूपाने अलीकडेच संपादक या नात्याने प्रकाशित केले. श्री. धुमें यांचे चिरंजीव श्री. चंद्रनाथ शेणवीं धुमें हे सध्या श्री. मंगेश देवस्थानच्या कार्यकारिणी समितीचे अध्यक्ष आहेत व वडिलांचा वारसा पुढे चालवीत आहेत. त्यांच्याकडून या पुस्तक निर्मितीला उत्तेजन व सहकार्य मिळाले. श्री. चंद्रनाथ धुमें यांचा मुलगा मयुरेश धुमें याने प्रकाशक म्हणून जबाबदारी स्वीकारली. इतिहासाचार्य धुमें यांची १४ जुलै २०१८ ही पुण्यतिथी. त्याच औचित्याने या ग्रंथाचे प्रकाशन झाले.

उपयुक्त माहिती, आकर्षक छायाचित्रे व सुबक छपाई यांमुळे हे पुस्तक संग्राह्य आहे.

('गोमंतक ज्ञानदीप' लेखक इतिहासाचार्य विनायक नारायण शेणवीं धुमें, मूल्य रु. ३०० : उपलब्ध : द. ना. नाडकर्णी, विलेपारले, ०२२-२६१२४१६२)

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| सुशांता जयंत बोरकर, गोरेगांव | व | रोहित लक्ष्मण पै, मीरा रोड, |
| समीर अजित नाडकर्णी, माहीम | व | सिद्धीता देवदत्त साखोळकर, पवई |
| अपूर्व अनिल तेलंग, खार | व | धनश्री उमानाथ कामथ, पुटुर |
| रुपाली राजन वागळे, प्रभादेवी | व | महेश नामदेव दलाल, नागपूर |



# Know your Sangh

| | | |
|---|---|---|
| **Founded** | : | 10th November 1935 |
| **Registration** | : | Registration No. F-4426 with Charity Commissioner |
| **Main Objects** | : | 1. To Diffuse useful knowledge and foster the spirit of union, brotherhood and cooperation among NKGSB Smarth community of Kavale Math<br>2. To relieve distress in community to needy persons by providing monetary assistance including expenses for marriage, medical treatment etc. |
| **Current Activities** | : | Publishing Quarterly House Magazine called 'Mukhapatrika' as per part 1 of 'Main Objects' stated above, holding Haldi Kumku ceremonies in Mumbai and Eastern suburbs during Shravan and Makar Sankranti, holding Annual Get together with Chief Guest of Eminence and felicitating senior citizens who have attained 75 years of age, and couples completing Golden Wedding Year, Arranging picnics and camps, holding food festival, cultural programmes etc. |
| **Medical Assistance** | : | Including that for Cancer, Bypass, Dialysis etc. Total Rs. 6.57 lakhs to 25 persons during the last financial year (17-18) |
| **Financial Assistance** | : | Currently Rs. 3300 PM (24 families), Rs. 3800 PM(14 families with 1 dependant), Rs 4300 PM (3 families with 2 dependants) and Rs. 4400 PM (21 lonely senior citizens) |
| **Managing Committee** | : | Chairman and Eight Members elected for the term of 3 years. |
| **Membership** | : | Fee Sevak: Rs. 500, Life memberRs.250<br>Total members 1230 on 31.3.2018 |

# ELOCUTION COMPETITION

From this year the Sangh has proposed to hold yearly elocution competition for the students of our community for age group 3 to 15 years. This is to give platform to the youngsters to be bold to appear in public, to remove stage fright, to improve upon diction, presentation skills, oratory and presence of mind. Parents and grandparents are requested to encourage their pals to take advantage of this opportunity.

Date : Sunday 30th September.
Venue : Tendulkar Hall, Mogul Lane, Mahim
Time : 4 pm
Language options : Konkani, Marathi, Hindi, English.
Age counted : As on 30 September 2018

**Group I : Age 3 to 6 years.**

Topic : Reciting any poem, or telling any story.
Duration : 3 minutes.
Prizes : To all the participants

**Group II : Age above 6 years to 10 years.**

Topic : Marathi : 1. वृक्ष आपले मित्र. 2. माझा आदर्श 3. मला हवे असलेले माझ्या आयुष्यातले बदल.

English : 1. Importance of Planting Tree
2. My role model 3. Changes I want in my Life

Duration : 5. minutes.

**Group III : Age above 10 years to 15 years**

Topic : Marathi : 1. प्लॅस्टीक बंदी व त्याचे परिणाम. 2. इंटरनेट शाप की वरदान. 3. वाचाल तर वाचाल.

English : 1. Plastic Ban and its effects.
2. Internet : Boon or Bane 3. Read to survive.

Duration : 5 minutes.
Prizes : 3 each for Groups II and III

LAST DATE FOR INFORMING ABOUT PARTICIPATION : **25th September.**
Contact Person : **Smt. MRUDULA BHANDARKAR.**
ON **Tel. :** 23877301, 23880073. **Timing :** 3 to 6 pm
with name, address, age group, contact number.

**Note :** If there are not enough of entries, the programme will be cancelled and the participants will be informed accordingly.



# ठाणे मंचची ज्येष्ठ नागरिक सहल

दरवेळेप्रमाणे ह्या वेळीही ठाणे मंच आयोजित १४ ते १६ मार्च २०१८ रोजी केळवे-माहीम येथील 'विहंग-विहार' या रिसॉर्टमधील ज्येष्ठ नागरिकांची सहल खूपच मस्त झाली. रिसॉर्ट समुद्राकाठीच होते. पण समुद्र खूप आत होता. जाताना बसमधील चविष्ट नाश्त्याची सोय दुर्गादास रेगे यांनी केली होती. रिसॉर्टमधीलही नाश्ता व जेवण रुचकर होतेच शिवाय तेथील लोकही अगत्यशील होते. त्यामुळे सर्वच जण मस्त पिकनिक मूड मध्ये होते.

आम्ही 'तू-तू, मैं मैं' करत हौजी खेळलो. रेखाताई सलगर व चित्रा कामत यांनी खूप छान गेम्स आणले होते, ते खेळताना आम्हांला खूप मजा आली. एक दिवस तेथील आशापुरा देवी व शंकराच्या देवळाचे दर्शन घेतले. रिसॉर्टचा परिसर खूप रम्य व मोठा होता. बाजूलाच भाजीचा मळा होता. सर्व बायकांनी तेथील ताजी भाजी घेतली. शिवाय पालघर येथील राईस-मिलमध्ये जाऊन बरीच खरेदी केली.

यावेळची सर्वात सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे आम्ही तिकडे आस्वाद घेतलेले मासे! आणि त्या माश्यांचे वर्णन मी मराठीत करूच शकत नाही. त्यासाठी आपण दोन मैत्रीणींचे फोनवरचे व दोन मित्रांचे मासळी बाजारातील कोकणी भाषेतील संभाषण वाचू या.

**(१)** (विमल पिकनिका गेल्ले ताका वासंती फोन करता)

वासंती : कशी जाली गो तुमगेली सिनीयर सिटीझन ट्रीप विमले ?

विमल : अगो वासंती, किते सांगू तुका सायबिणी! अश्ये नुस्ते खाल्ले म्हण सांगु, अगदी कारवारची याद आयली गो!

वासंती : खरें की किते ?

विमल : मागिर हांव खोटे सांगता की कितें ? अगो तो आमगलो अरुण कसबेकर आणि तागेली बायल प्रभा, हांका वळकता मूं ?

वासंती : तांका कोण कारवारकार वळकनां ?

विमल : अगो त्या अरुणान आणि प्रभान स्वत: क्रॉफर्ड मार्केटा वचून तांगेल्या वळकीच्या कोळणीकडल्यान हीऽऽ एेदी व्हडली २६ पापलेटा आणि तुजे एेदो व्होड विसवण (सुरमई) मस्त बर्फात पॅक करून हाडील्ली, कितली ताजी म्हण सांगू तुका ? खरे गो, अगदी प्रेमान चर्चगेटच्यान घेवन आयली पळय दोघायजणां! सगळी जण एकदम खुश जाली.

वासंती : खरे गो ? मगेली चुकली गो पिकनीक.

विमल : हय गो, आसू, फुडले खेपे बेगिन नाव दि पालेकराकडे.

**(२)** सुरेश ट्रिपावचून आयला.  नुस्त्या बाजारात ताका दिलीप मेळता.

दिलीप  : अरे सुरेशा किते मेळ्ळे रे नुस्ते ?

सुरेश : अरे आज मगल घरा लोका येवंची आसात म्हण आयला, ना जाल्यावर हाव नुस्ते खावन अगदी तृप्त आसा.

दिलीप : अरे कितं म्हणता ? तु ठाणे मंचच्या कॅम्पाक गेल्लो थंय भरपूर नुते खावन आयलो दिसता.

सुरेश : अरे दिलीपा, तुका सांगता, आमगल्यो कारवारी बायला म्हळ्यार खरी हुशार रे! अरे त्या अरुण कसबेकरान हाडिल्या नुस्त्याखातेर ताणी रिसॉर्टच्या किचनचो ताबोच घेतलो मरे!

दिलीप : किते सांगता ?

सुरेश : इतलेच नी, रिसॉर्ट पाविल्या दिसाक सांजेर आमी, समुद्रा वेळेर, गेल्ली, तेन्ना ह्या बायलाक मरे लांबच्यान ४ कोळणी दिसल्यो, त्या बरोबर वदरावदर कन्न, तांका आपौन ताचे फाटल्यान धावल्यो मरे त्यो! आणि ताज्यो तिसऱ्यो घेवनच सोडल्यो. रिसॉर्टच्या रानप्याक रेसिपी सांगून आयल्यो, रात्री जेवणाक तिसऱ्याचे केल्ले समा जाले ना, म्हण आमगल्यो भगिनी सुधा दळवी आणि दीपा मुजुमदार हाणी फुडाकार घेवन अरुणान हाडिल्या नुस्त्याचे अशे काय भरील्ले पापलेट आणि भाजिल्लो विसवण बनयलो की यंव रे यंव ?

त्या तीन दिसातली चव अजुन आसा पळय जिभेर! त्या लोकानबी भाजिल्ले बोंबील, मांदेळी आणि सुंगटा आंबट, शिवाय मटण, चिकन बी बरे केले रे! पण तुका खरे सांगता, आमगेल्या या भगिनीन व आणि तांका मदत केल्ली ती रेखा पालेकर, सुषमा मुळगावकर आणि आशा रेगे, ह्या सगळ्यान आराम करचो सोण्ण बरे कष्ट घेतले. खरे कौतुक हां!

दिलीप : तुवे म्हळ्ळे ते सगळे नुस्ते घेता आणि बायलेक करच्या सांगता. तु म्हणता ते १००% पटता माका. आमगल्यो कारवारकर बायलो खरे सुगरण रे!

वाचलात ना हा संवाद, ह्यात अजिबात अतिशयोक्ती नाही, तोंडाला पाणी सुटले ना!

रेखा पालेकर यांनी सुपारी विरहित मुखवास आणला होता आणि प्रत्येक नाश्त्या व जेवणानंतर सर्वांनी ह्याचा मस्त आस्वाद घेतला.

सुरेश पालेकर व किरण दिवेकर यांनी खरोखरच अगदी खूप मेहनत घेऊन, मनापासून पिकनीक आयोजित केली होती.

पुढच्या ट्रीपचे बुकींग ऑलरेडी झाले आहे. Sorry! (Just kidding)

**– मंजिरी मनोज कुलकर्णी**

(वरील संवादातील नावे काल्पनिक आहेत. पण सर्वांच्या मनातील  'मन की बात' आहे)



## 'वसंतोत्सव' ठाणे मंच

सुरुवातीपासून शेवटपर्यंत अतिशय सुरेख बेतलेला कार्यक्रम असे वर्णन करता येईल ठाणे मंचच्या २१ एप्रील १८ रोजी सहयोग मंदिर  ठाणे येथे झालेल्या 'वसंतोत्सव' सांस्कृतिक कार्यक्रमाचे.

खरं म्हणजे कार्यक्रमात अजिबात ताळमेळ नव्हता, ना गाण्यांचा एकमेकाशी संबंध, ना नाचाचा, ना कसलाही. तरीही एक उत्कृष्ट यशस्वी कार्यक्रम म्हणून दाद मिळाली सर्व प्रेक्षकांची! कारण प्रत्येक कलाकाराने आपली कला अगदी मनापासून आनंद घेत सादर केली. थोडक्यात, आपण रांगोळीत जितके विविध रंग भरतो, तितकी ती रांगोळी अधिकाधिक खुलून दिसते. तसेच या कार्यक्रमात जेवढे वेगवेगळे रंग कलाकार भरत गेले तितका कार्यक्रम रंगत गेला, खुलत गेला व एक अतिशय सुंदर रांगोळी तयार झाली. कलाकार रांगोळीच्या खाली, पांढऱ्या रांगोळीने आपली लफ्फेदार सही करतो, त्या सहीला रंग नसतो. पण महत्त्व जरूर असते. ती सही म्हणजे शीला दिवेकर व मंजिरी कुलकर्णी यांचे निवेदन.

प्रथम श्री दुर्गादास रेगेमामानी दीपप्रज्ज्वलन केल्यानंतर सुरुवात मिथिला गायतोंडे यांच्या 'सुंदर ते ध्यान' या अभंगावरच्या अप्रतिम नृत्याने झाली.

त्यानंतर गाण्याच्या मैफीलीला सुरुवात झाली ती अलका वर्टी यांच्या सुमधुर गणेशस्तवनाने. स्मिता वाघ 'नाही मी बोलत  नाथा' इतके समरसून गायल्या की प्रेक्षकांनी वन्स मोअर दिला. प्रिया व प्रभात कुलकर्णी यांनी 'शुक्रतारा मंद वारा' हे गीत अतिशय सुंदर पेश केले. लता  नायर यांनी अनोखे कोंकणी लोकगीत गाऊन लोकांना त्यावर ताल धरायला लावला.  प्रज्ञा वागळे यांनी जुने मराठी चित्रपटातील गीत आपल्या सुमधुर आवाजात अप्रतिम सादर केले. निशिकांत नाडकर्णी यांनी एका वेगळ्याच विषयावर प्रहसन सादर केले व लोकांनाही ते आवडले. मृणाल दळवी यांनी 'सोळावं वरीस' ऐवजी 'साठावं वरीस धोक्याचं'  ही लावणी अगदी ठसक्यात सादर केली. गौरांग तेलंग यांनी संत चोखामेळा यांचा अभंग गाऊन  श्रोत्यांची मने जिंकली. अनिल नाडकर्णी यांनी जुने हिंदी सिनेमातील मुकेश गाणे सुरेलपणे गायलेच शिवाय प्रज्ञा वागळे बरोबर द्वंद्वगीत गाऊन वाहवा मिळवली. या मैफीलीची सांगता गौरांग तेलंग यांच्या 'सजल नयन नीत धार बरसती' या भैरवीने झाली, गौरांगच्या आवाजाने व गायकीने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

मध्यंतरात गरमागरम बटाटेवडे, आंबा बर्फी खाऊन चहा व गप्पा मारून प्रेक्षक परत स्थानापन्न झाले. मिथिला गायतोंडे यांना थोड्या अवधीत शास्त्रीय नृत्यात प्रावीण्य मिळविले आहे.  'ढोलना' या चित्रपटगीतावर बहारदार शास्त्रीय नृत्य सादर केले. रेखा,

सुरेश पालेकर यांची नात सान्वी हिने 'छम छम छम छम' हे नृत्य जोशात सादर करून धमाल केली. लता नायर यांचा नातू नील याने 'धडक, धडक' गाण्यावर आवेशपूर्ण नृत्य सादर केले. विजय वागळे यांनी शिट्टीवर सुरेल अशी तीन गाणी सादर केली. आपली सुरेल गळ्याची गायिका स्मिता वाघ यांनी 'सवार लू' या गाण्यावर लालीत्यपूर्ण नाच केला. या नृत्याचे दिग्दर्शन मिथिला गायतोंडे यांनी केले होते. योगेश साळगावकर यांनी 'चेहरा है या चांद खिला' सुरेलपणे सादर केले. दीपा मुझुमदार यांनी मालवणी बाईचे स्वप्न असे काही मस्त रंगवले की लोकांची हसून हसून मुरकुंडी वळली. मेघना मुळगावकर यांनी आपल्या गोड आवाजात 'दिल तो है दिल' हे गाणे सुरेख पेश केले. सतीश वागळे यांनी सुरेल बासरी वादन करून प्रेक्षकांची मने जिंकली.

सर्वात शेवटी **Climax** म्हणजे ज्येष्ठ नागरिकांचा तरुणांना लाजवील असा जोशपूर्ण, उत्साहवर्धक 'दिल हिला देनेवाला' डांस डॉ. रेखा दिवेकर, शैलजा पै, दीपा व दिलीप मुझुमदार, सुरेखा व सुरेश पालेकर यांनी मस्तच सादर केला व त्यांना उत्कृष्ट साथ दिली ज्येष्ठ नागरिक नसलेल्या मिथिला व शशांक गायतोंडे यांनी. हा नाच बसवण्यासाठी मिथिला गायतोंडे यांनी अथक परिश्रम घेतले. या नाचाला वन्स मोअर मिळाल्यावर त्याच उत्साहात सर्वांनी परत सादर केला.

शेवटी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कलाकारांसाठी पडद्यामागे खूप मेहनत घेतलेल्या चित्रा कामतसाठी, आभार प्रदर्शन केल्याबद्दल सुधा दळवीसाठी व दोन्ही निवेदिकांसाठी जोरदार टाळ्या. (खरं सांगू. 'जोरदार टाळ्या'नी या कार्यक्रमात चोख व महत्त्वाची भूमिका बजावली.)

**मंजिरी मनोज कुलकर्णी**, ठाणे.


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**


**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,
Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**
**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**




## श्री मंगेशाची आरती



जयदेव जयदेव जय जय मंगेशा ।
सुखदात्या कुलदेवा जय मंगिरीशा ।। धृ ।।

प्रेमळ लोमशर्मा भक्तांचा त्राता ।
सन्मुख श्रीपुरुषोत्तम बहुभाग्यदाता ।।
सान्निध्यी शिवशर्मा संसारी नेता ।
स्वकुलास्तव गोमांतकि वससी भवनाथा ।। १ ।।

शांतादुर्गा पाळी पोषी भक्तांना ।
महालक्ष्मी मातेपरि सांभाळी त्यांना ।।
सदया महालसाही रक्षी सकलांना ।
दिव्य अशा शक्ती या प्रकटल्या नाना ।। २ ।।

वैराग्या आनंदा ठाव तुझ्या ठायी ।
निवृत्तिप्रवृत्ति लोळति तव पायीं ।।
रुद्रस्वरुप शिवमय शंकर सुखदायी ।
प्रगटुनियां भक्तांते पावसी लवलाही ।। ३ ।।

मुलकेश्वर संकटी धांवत ये वेगें ।
साह्य करी भक्तां जे पिडिले भवरोगें ।।
भक्तांस्तव रात्रंदिन प्रेमभरें जागे ।
नित्य करी संरक्षण राहुनिया मागे ।। ४ ।।

जयजय महालसे श्रीमहालक्ष्मी माते ।
जय पुरुषा शिवशर्मा जय देवी शांते ।।
जय जय लोमशर्मा जय दे आम्हांते ।
मुलकेश्वर मंगेशा रक्षीं बाळां तें ।। ५ ।।

सारस्वत कुलवर्धक संरक्षक देवा ।
बाळावरि करुणाघन प्रेमे वर्षावा ।।
प्रपंच परमार्थाचा लाभ तया व्हावा ।
अर्पी वामन पायी निष्काम सेवा ।। ६ ।।

- ऋग्वेदी

प्रायोजन सौजन्य : वामन (किरण) दुभाषी, विले पारले

# प्रतिक्रिया

## वसंत फेणे लिखित 'कारवारी माती'

जानेवारीच्या मुखपत्रिकेच्या अंकात 'कारवारी माती' या कादंबरीची प्रसिद्धी वाचल्यानंतर थोड्याच दिवसांत लेखक श्री वसंत नरहर फेणे दिवंगत झाले,. त्यांच्या साहित्यिक लिखाणाबद्दल कौतुकाचा विस्तृत आढावा दै. लोकसत्तामध्ये प्रसिद्ध झाला होता. 'कारवारी माती' ही कादंबरी मी ग्रंथाली प्रकाशनाकडून विकत घेऊन वाचून काढली. होन्नेकेरी गांवस्थित गणपत हिचकड, पत्नी गंगाबाई, मेव्हणे अवर्सा गांवचे पुत्तण्णा/गजा देसाई, कारवारच्या श्रीपाद किन्नरकर कुलकर्णींस दिलेली मुलगी 'मथी' आणि मुलगा विद्याधर यांच्या भोवती कथानक फिरत राहते. सर्व घटना १९०१ ते १९४७ या स्वातंत्र्यपूर्व काळात होन्नेकेरी, अंकोला, अवर्सा, कारवार, धारवाड, मुंबई या स्थानांत झालेल्या आहेत. आणि कथानकाला पार्श्वभूमी देतात. आम्ही नाडकर्णी कुटुंबीय होन्नेकेरी वाड्यावरचेच तेव्हा कादंबरी वाचून माझ्या गांवच्या जुन्या स्मृतींना सुखद उजाळा मिळाला.

स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेल्या व तुरुंगवास भोगलेल्या माझ्या काकांचा, यशवंत त्रिंबक नाडकर्णी, कारवारचे वाय. टी. वकील तसेच हळदीपुर वकील आणि भूमिगत राहून चळवळ चालविलेल्या प्रभू वकिलांचा उल्लेख कथानकात आल्याने बरे वाटले.

वाचनाची आवड असलेल्या कोणाही कारवारकराला ही कादंबरी वाचायची असेल तर त्याने माझ्याशी ९००४३३८५६८ या क्रमांकावर संपर्क साधावा. पुस्तक पोहोचविण्याची जबाबदारी माझी.

**शशिकांत विनायक नाडकर्णी**, माहीम.

## मंत्रपुष्पांजली व गायत्री मंत्र

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकातील श्री. अरुण कसबेकर यांचा 'अखेर मला उत्तर सापडलेच' हा लेख वाचनांत आला. त्या लेखात त्यांनी हिंदूंची जागतिक प्रार्थना 'मंत्रपुष्पांजली' ही असावी असे प्रतिपादन केले आहे. ही प्रार्थना उच्चारासाठी एवढी कठीण आहे की, ती जागतिक प्रार्थनेसाठी म्हणून योग्य नाही. लेखकांनीच नमूद केले आहे की, 'इतकेच काय, जे पौरोहित्य करतात त्यांना पण ती नीट उच्चारता येत नाही.' म्हणजे आपल्याच मताचे त्यांनी स्वतःच खंडन केले आहे. 'मंत्रपुष्पांजली' ऐवजी 'गायत्री मंत्र' याची जागतिक प्रार्थना म्हणून निवड झाली तर जास्त संयुक्तीक होईल. तो मंत्र सुटसुटीत आहे व आबालवृध्दांना उच्चारण्यासाठी सुलभ आहे व गेय आहे. या मंत्रातील शेवटचा 'धियो यो नः प्रचोदयात्' म्हणजे जो (कुमार्गाला नेणाऱ्या) आमच्या बुध्दीला (सन्मार्गाकडे वळविण्याची) प्रेरणा देवो. हा मंत्र अर्थपूर्ण प्रार्थनेच्या लायकीचा आहे असे माझे मत आहे.

**वंदना नाडकर्णी**, पारले



# ऋणको ते धनको - एक अनोखा प्रवास (१)

जून २४, २०१८ रोजी माझ्या वयाची ८० वर्षे पूर्ण झाली. म्हणजे सहस्र पौर्णिमा बघितल्याचे भाग्य माझ्या भाळी रुजू झाले. माझे असे मत आहे की, या वयात माणूस आपल्या सबंध आयुष्यातल्या घडामोडींचा अगदी प्रामाणिकपणे आढावा तसेच परामर्श घेऊ शकतो. या वयात त्याच्याकडे विचार करायला भरपूर वेळ असतो. आपण काय योग्य-अयोग्य केले, कुठे आपण स्वार्थाला बळी पडलो, कुठे स्वार्थावर मात करू शकलो, त्याचे अगदी प्रामाणिक विश्लेषण या वयातच करणे शक्य आहे. आपण सर्व जगाला फसवू शकतो, पण स्वतःच्या मनाला, सद्सद्विवेकबुद्धीला फसविणे शक्यच नाही.

माझ्या आयुष्यात इतके चढउतार आले की, माझाच विश्वास बसत नाही की या सर्व आव्हानांचा मी कसा सामना करू शकलो. एका गोष्टीची मला पूर्ण खात्री आहे आणि ती म्हणजे माझ्यावर असलेला आई शांतादुर्गेचा कायमचा वरदहस्त आणि माझी तिच्यावरील अतीव श्रद्धा. १९५४ मध्ये कारवारच्या हिंदू हायस्कूलमधून एस.एस.सी. झाल्यावर मुंबईला आलो. अभ्यासात जरी हुशार असलो तरी मुंबईच्या फाडफाड इंग्रजी बोलणाऱ्या मुलांसमोर स्वतःबद्दल न्यूनगंडाचीच भावना होती. (Inferiority Complex)

ताजमहाल हॉटेलला लागून असलेल्या फुटपाथवरून चालण्याची सुद्धा माझी योग्यता नाही अशी समजूत झाली होती आणि दैवयोग बघा त्याच ताजमहाल हॉटेलमध्ये अतिशय महागड्या आलिशान अशा Rajput Suite (राजपूत स्वीट) मध्ये काही वर्षातच मी दहा-बारा रात्री तरी राहिलो असेन. कधी गेटवे ऑफ इंडियाजवळ गेलो तर दुरूनच समोरच्या फुटपाथवरून मोठ्या आदराने ताजमहाल हॉटेलचे निरीक्षण करत असे. या हॉटेलमध्ये राहणाऱ्या लोकांचे आदरमिश्रित कौतुक माझ्या डोळ्यात स्पष्ट दिसे.

IISCO त नोकरी करतांना १९६२-६३ मध्ये जेव्हा आमचे Chairman साहेब Sir Biren Mookerjee मुंबईला यायचे तेव्हा ताजमध्ये त्यांचा मुक्काम असे. बऱ्याच वेळा ते कलकत्त्याहून सकाळी मुंबईला येत व संध्याकाळी परत कलकत्त्याला जात. दुपारी फक्त काही तासांकरिता ते ताजमध्ये वामकुक्षी घेत. मी सर्वात ज्युनियर ऑफीसर असल्यामुळे सरसाहेबांसाठी ताजमधील राजपूत स्वीटचे बुकींग करण्याची जबाबदारी माझी होती. जरी काही तासांकरिताच सरसाहेब तो स्वीट वापरत असले तरी हॉटेल नियमानुसार तो स्वीट आम्हाला २४ तासांकरिता बुक करावा लागे. अशावेळी मी ऑफीस सुटल्यावर सरळ आमच्या IISCO च्या नावाने बुक केलेल्या त्या स्वीटमध्ये रात्री राहून हॉटेल तर्फे भेट असलेली फळांची मोठी करंडी आणि एक फुलांचा जबरदस्त मोठा गुच्छ घेऊन मी सकाळी घरी जात असे. ज्या ताजमहाल लगतच्या फुटपाथवरून जाण्यास मी कचरत होतो तेथे काही वर्षातच अतिशय महागड्या स्वीटचा मला बऱ्याच वेळा उपभोग घ्यावयास मिळाला.

आजी-आजोबांच्या कडक शिस्तीत कंदिलाच्या उजेडात अभ्यास करून हिंदू हायस्कूल कारवारमधून १९५४ साली मी एसएससी चांगल्या मार्कांनी पास झालो. घरी जेवायला-खायला अगदी भरपूर! कशाचीही कमतरता नाही! पण मला आठवत नाही कधी एसएससी होईपर्यंत मी हॉटेलमध्ये एक कप चहा घेतला असेल. धुम्रपान-मदिरासेवन तर अक्षम्य अपराध! हे सर्व कडक संस्कार असून सुद्धा मी १८ वर्षाचा होतो तेव्हा अधूनमधून सिगारेट ओढायला लागलो. एक-दोनदा सुरापानाचाही आस्वाद घेतला. लहानपणी चिमणी कावळा बघता बघता कधी आयुष्य किंगफिशरपर्यंत गेलं ते कळलंच नाही. इतकेच नव्हे तर १९७० मध्ये, म्हणजे वयाच्या ३२ व्या वर्षी, मला महालक्ष्मी रेसकोर्सवर घोड्यांच्या शर्यतीत बेटींग करण्याचा सुद्धा नाद लागला. माझे ऑफीस - IISCO - मुंबईमध्ये ७०% स्टाफ हा पारसी होता व सगळे पारसी घोड्यांच्या रेसचे पट्टीचे दर्दी होते. एकदा केवळ गंमत म्हणून मी त्यांच्याबरोबर रेसला गेलो होतो व एका बरोबर भागीत रुपये दहाचे तिकीट घेतले. रेस सुरू झाली आणि तसेच माझ्या छातीतही धडधड सुरू झाली. आम्ही लावलेला घोडा जिंकला. दहा रुपयांचे पंधरा रुपये मिळाले. मला अडीच रुपये फायदा झाला आणि माझी रेसला नियमित जायला सुरुवात झाली. पण ती पहिल्या खेपेची धडधड मला नंतर कधीच परत अनुभवता आली नाही. रेसमध्ये माझा शिरकाव अगदी professional होता किंबहुना mathematical होता असे म्हणणे जास्त योग्य ठरेल. माझी ४०० पानांची एक वही होती व त्यात जवळजवळ ३०० घोड्यांची संपूर्ण माहिती मी लिहिली होती. घोड्याचे आईबाप कोण (pedigree), वय किती, Class V-B पासून Class 1 पर्यंत कसा चढत गेला, किती रेसेस जिंकला, रेसमध्ये तो किती वजन घेऊन धावत आहे त्याचे फेवरिट डिस्टन्स काय? कुठला जॉकी त्याला जास्त यशस्वीपणे हाताळू शकतो वगैरे वगैरे. मी माझा एक फार्मुला तयार केला होता व धावणाऱ्या १२ घोड्यांपैकी ती रेस कुठल्या तीन घोड्यांमध्ये आहे हे मी अचूक सांगू शके. IISCO मधील Accounts Officer श्री मिस्त्री नेहमी म्हणायचे की शेअर बाजारात तेजी आणि मंदी असे फक्त दोनच घोडे धावतात, तरी हजारो लोक त्यांच्या नादात बरबाद होतात आणि इथे रेसकोर्सवर १२ धावणाऱ्या घोड्यातून एक विनर शोधून काढणे किती कठीण आहे. पण त्यानेही रेसकोर्सवर नियमित जाणे काही सोडले नाही.

रेसकोर्सवरील अनेक रोमांचक असे प्रसंग माझ्या आयुष्यात घडलेले आहेत. त्यातले फक्त दोनच इथे नमूद करतो...

**पहिला प्रसंग** - सन १९७३ साली आधीच्या तीन रविवारी जॅकपॉट कॅरीड फॉरवर्ड झाल्यामुळे, ४ थ्या रविवारी जॅकपॉटची प्रचंड रक्कम जमा झाली होती आणि रेसकोर्सवर अतोनात गर्दी होती. मी Members' enclosure मध्ये खचाखच गर्दीत कसाबसा बसलो होतो. माझ्या शेजारी एक पारसी बावा बसला होता. तो सहज गमतीने मला म्हणाला - ''देखो आजका जॅकपॉट मैं बोलता हूँ वैसे ही निकलेगा.''



1st leg-Lovely Lady - क्योंकि - Indira Gandhi is a lovely lady
2nd leg-Victorious - क्योंकि - we were victorious against Pakistan
3rd leg-Billionaire - क्योंकि - after victory you make money
4th leg-Ummid Inse - क्योंकि - हम इंदिरा गांधीसे ऐसी उम्मीद रखते है
5th leg-Dick mink - क्योंकि - Indira Gandhi deserves a mink coat"

प्रत्येक leg मागचे त्या बावाचे-logic मला खूपच आवडले व त्याला वरीलप्रमाणे तिकीट काढण्यासाठी, मी त्याची जागा अडवून ठेवण्याची हमी दिली. पण त्या बावाने ticket counter वर शेवटच्या क्षणी Billionaire काढून दुसऱ्या घोड्याचे नाव घातले. मी स्वत: गंमत म्हणून त्या पारसी बावाने सांगितल्याप्रमाणे एक दहा रुपयाचे तिकीट घेणार होतो. पण त्यालाच, त्याच्या भाकिताप्रमाणे माझ्यासाठी तिकीट आणण्यास सांगणे योग्य वाटले नाही व गर्दी तर इतकी प्रचंड होती की मी तिकिटाचा नाद सोडला. बावांच्या भाकिताप्रमाणे एका मागून एक सर्व घोडे आले. फक्त एकमेव तिकिटावर प्रसिद्ध गीतकार श्री. राजेंद्र किशन यांना ४६ लाख रुपयांचा जॅकपॉट लागला. मी जर ते दहा रुपयाचे तिकीट काढले असते तर मला अर्धे म्हणजे २३ लाख रुपये (Tax paid) मिळाले असते. आज त्या २३ लाख रुपयांची किंमत कमीत कमी २५ कोटी रुपये झाली असती. १९७३ मध्ये सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम रु. २७८.५० होता आणि आज रु. ३११५० आहे - १११ पट.


**दुसरा प्रसंग** - हा रेसचा नाद इतका वाढला होता की पावसाळ्यात मुंबईमध्ये रेसेस बंद असतात तेव्हा शनिवारी सकाळी आम्ही उभयता पुणे किंवा बंगळूरला जात असोत. बंगळूरला शनिवारी रविवारी रेस खेळून रविवारी रात्री किंवा सोमवारी सकाळच्या फ्लाईटने मुंबईला परत येत. बंगळूरला एका रविवारी माझ्या खिशात फक्त २५० रुपये होते. बाकी सर्व रक्कम मी शनिवारच्या रेसमध्ये हरलो होतो. मद्रास रेसकोर्सचे Stewart श्री. रामस्वामी मला बंगळूर रेसकोर्सच्या मेंबर्स एनक्लोजरमध्ये दिसले. मी सरळ त्यांच्याकडे गेलो व म्हणालो-"Sir! If you don't give me a good tip for the next race, we will have to foot back to Bombay." चेहऱ्यावर एक मंदस्मित आणून श्री. रामस्वामी मला म्हणाले - Back "Fast Sailing"! जरा सुद्धा विचार न करता मी २०० रुपये ''फास्ट रेलींग'' वर ८ च्या भावाने लावले. घोडा जिंकला. आणि मला रु. १६००+२०० = १८०० परत मिळाले. त्यानंतर मी श्री. रामस्वामींच्या ते वैतागेपर्यंत, सावलीसारखा मागे होतो. त्या दिवशी मी जवळ जवळ २४००० रुपये जिंकलो. एक १२००० रुपयाची फियाट गाडी घेतली आणि पुर्णिमा सिल्क हाऊसमधून खुपशा महागड्या साड्या वगैरे घेऊन आम्ही त्या नवीन घेतलेल्या गाडीने By road मुंबईला आलो. २४००० रुपयांपैकी फक्त ६ हजार रुपये उरले होते. ते मी एका खास पेटीत ठेवले व शपथ घेतली की यापुढे रेसमध्ये कमाई किंवा हार त्या पेटीतल्या पैशातूनच होणार. ज्या दिवशी ती पेटी रिकामी होईल त्या क्षणापासून मी

कुठल्याही रेसकोर्सवर पाय ठेवणार नाही. तो दिवस अंदाजे १९७६ मध्ये आला व ती पेटी रिकामी झाली. मी १९७६ नंतर आजतागायत रेसकोर्सवर पाय ठेवला नाही. १९७० ते १९७६ मी रेसमध्ये चिक्कार रुपये कमवले व सर्व तिथेच गमावले. पण तो सहा वर्षाचा काळ अतिशय रोमांचक, साहसी आणि आनंददायक ठरला.

मी स्वत:ला खूपच भाग्यवान समजतो. कंदिलाच्या उजेडापासून डिजीटल टेक्नोलॉजीच्या प्रकाशापर्यंत भरपूर अनुभव! भगवद्‌गीतेच्या सर्व अध्यायांचे पूर्ण पाठांतर. शिवाय आजी आजोबांच्या कडक शिस्तीच्या संस्कारापासून, सिगारेट, सुरा आणि घोड्यांच्या रेससारख्या जुगारापर्यंतचा सुद्धा भरपूर अनुभव! अनेकदा संपूर्ण जगभ्रमण! जगातील 5-Star च नव्हे तर 7-Star हॉटेल्समध्ये राहण्याची, तसेच विमानातून Business Class च नव्हे तर First Class मधून प्रवास करण्याची वारंवार संधी! आणि हे सर्व भोगताना जरासुद्धा मतिभ्रष्ट न होता, निरीच्छ वृत्तीने पाय सदोदीत जमिनीवरच राहिले हे आईशांतादुर्गेच्या आशीर्वादाचेच फळ नाही का?

क्रमश ...

**– अरुण भास्कर कसबेकर**
९८२०२९१३६५/८७७९९८६६०६ / arunkasby@gmail.com






# श्रद्धांजली

## कारवार भूषण ॲडमिरल जयंत नाडकर्णी कालवश

भारतीय नौदलाचे माजी प्रमुख ॲडमिरल (निवृत्त) जयंत गणपत नाडकर्णी यांचे २ जुलै रोजी कर्क रोगाने मुंबईत निधन झाले. दुसऱ्या दिवशी त्यांच्या पार्थिवावर पुणे येथे लष्करी इतमामाने अंत्यसंस्कार करण्यात आले.

जयंतराव मूळचे अगळी गावचे. त्यांचे वडील गणपत नाडकर्णी हे ज्ञातीतले पहिले एम्.एस्सी. ते लेमन्क्रीन नाडकर्णी म्हणून परिचित होते. जयंतरावांची बहीण डॉ. लीला बेनकर या ज्ञातीतील पहिल्या महिला वैद्यकीय पदवीधरांपैकी एक. बंधु श्री ज्ञानेश्वर कला समीक्षक व टीकाकार म्हणून प्रसिद्ध होते. अशा या सुशिक्षित घराण्यात जयंतराव यांचा ५ डिसेंबर १९३१ रोजी जन्म झाला. गिरगावांतील सुप्रसिद्ध चिकित्सक शाळेतून शालेय शिक्षण झाल्यावर नौदलाच्या 'डफरीन' या शिकाऊ बोटीवर त्यांनी शिक्षण घेतले. नंतर वेलिंग्टनच्या संरक्षण दल अधिकाऱ्यांसाठी असणाऱ्या महाविद्यालयाचे ते पदवीधर झाले. नौदलातील चार दशकाच्या सेवेत त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण पदांची जबाबदारी सांभाळली. १९६१ सालच्या गोवा मुक्ति संग्रामात, १९६५ व ७१ च्या पाकिस्तान विरुद्धच्या युद्धात त्यांचा विशेष सहभाग होता. स्वत:च्या कर्तबगारीने त्यांना सतत पदोन्नती मिळत गेली व शेवटी १ डिसेंबर १९८७ रोजी नौसेनेतील अत्युच्च पदावर ॲडमिरल म्हणून रुजू झाले. ३० नोव्हेंबर १९९० पर्यंत तीन वर्षे त्यांनी ते पद सांभाळले. ते विशिष्ट पदक, नौसेना पदक, अतिविशिष्ट सेवा पदक, परमविशिष्ट सेवा पदक इत्यादी पुरस्कारांचे मानकरी झाले.

निवृत्तीनंतर जयंतराव पुण्याला स्थायिक झाले. नौदलाच्या गतेतिहासाबद्दल त्यांना विशेष रस होता. Maritime History Society या संस्थेचे ते संस्थापक होते व त्यांच्यातर्फे ते एक नियतकालिकही चालवीत होते. त्यांच्या दोन मुलांपैकी धाकटे रवींद्र हेही नौदलामध्ये रिअर ॲडमिरल या उच्च पदाला आहेत व कोची इथल्या तळाचे प्रमुख आहेत.

जयंतराव ज्ञातीच्या कार्यांत विशेष रस घेत. एकूण सात प्रसंगी स्वत: वा नातेवाईकांसह त्यांनी आपल्या एज्युकेशन सोसायटीला एकूण आठ लाख रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. यावरून त्यांचे ज्ञातीप्रेम लक्षात येते. १९९४ साली भरलेल्या ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात त्यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते. तेव्हा आनंदाने ते उपस्थित होते. १९९५ साली संघाने त्यांना 'सन्माननीय सभासद' म्हणून स्वीकृत केले. २०१६-२०१७ हे वर्ष म्हणजे आपल्या बँकेचे शताब्दी वर्ष. त्या निमित्त ठिकठिकाणी ग्राहकांचे व हितचिंतकांचे मेळावे भरविण्यात आले होते. पुण्यातील समारंभाला जयंतरावांनाच प्रमुख पाहुणे म्हणून पाचारण करण्यात आले होते.

जयंतरावांच्याच पुढाकाराने कारवार येथे आशियातील सर्वात मोठा नाविक तळ 'सीबर्ड' उभारण्यात आला. त्यामुळे कारवारचे महत्त्व वाढले. एवढेच नव्हे तर स्थानिक लोकांना प्रचंड रोजगार मिळाला. तेव्हा कारवार नगरपालिकेतर्फे कारवारकरांचे सुपुत्र म्हणून 'कारवार भूषण' असा त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

# माझी अष्टपैलू सिंधूताई



स्नेहलता मारुती तेलंग – पूर्वाश्रमीची सिंधू मंगेश गंडभीर – म्हणजेच माझी आवडती आते बहीण सिंधूताई, आम्हा सर्वांना सोडून गुरुवार दिनांक २४ मे २०१८ रोजी पंचत्वात विलीन झाली.

आम्ही पाच भाऊ – आम्हाला सख्खी बहीण नाही व माझ्या आत्येला पांच मुली – त्यांना सख्खा भाऊ नाही. परंतु सिंधूताईमुळे ही बहिणीची उणीव मला कधीच वाटली नाही.

सिंधूताई खरोखरच अष्टपैलू होती व तिचे हे अष्टपैलूत्व मी तुम्हाला खाली उलगडून देत आहे.

**पैलू नं. एक – अतिशय सुगरण –** ।।अतिथी देवो भव।। – हे तिचे ब्रीदवाक्य – जे पाळण्यात तिने जराही कसूर केली नाही. कोणाला काय आवडते ते तिला कसे समजत असे देव जाणे! पण प्रत्येक अतिथीला तो कोणीही असो सिंधूताईच्या घरी त्याला त्याच्या आवडीचेच जेवण मिळे.

**पैलू नं. दोन : – करिअर वूमन –**

रुईया कॉलेजमधून B.A. (Hons.) ची पदवी घेतल्यावर, लग्न, मुले व संसारात वयाच्या ४५ वर्षापर्यंत रमल्यावर तिने Deaf & Dumb Institute मध्ये डिप्लोमा घेतला व त्यांच्या शाळेत शिक्षिका म्हणून रुजू झाली. जवळजवळ १५ वर्षे अगदी त्यांच्यापैकीच एक होऊन ती मुलांना शिकवीत असे. इतकेच नव्हे तर त्यांना हसवत देखील असे. त्या शाळेत हसणे हे अगदी दुर्लभ दृष्य! सिंधूताई त्या मुलात आनंद शोधत असे व जर तो दिसला नाही तर स्वत: त्यांच्या आयुष्यात आनंद निर्माण करीत असे. घरातही मुलांची अतिशय काळजी घेऊन त्यांच्या उज्वल भवितव्याची वाटचाल त्यांना अगदी योग्य मार्गाने दाखवून दिली. मुलगा गिरीश–M.D. डॉक्टर, मोठी मुलगी – शुभदा M.Sc. (Pure Mathematics) आणि धाकटी – सीमा B.Com. उत्तमप्रकारे पास होऊन आपापल्या संसारात अगदी आनंदात रमलेल्या आहेत.

**पैलू नं. तीन : – फक्त आनंदाचाच शोध**, Oral Garnishing -

सिंधूताई वयाच्या ८८ व्या वर्षी आम्हाला सोडून गेल्या. आता फक्त आठवणीच राहिल्यात. पण ह्या सगळ्या आठवणीत मला फक्त आनंदाचेच क्षण दिसतात. मला वाटत नाही. सिंधूताईचे कोणी वाईट चिंतीत असेल. जिथे जाई तेथे सिंधूताई, वर सांगितल्याप्रमाणे, आनंदच



शोधत असे व तो नसल्यास निर्माण करत असे. एखाद्या मोठ्या हॉलमध्ये लोकांच्या गर्दीत सिंधूताईंना शोधणे अगदीच सोपे. जेथून हास्याचे फवारे उडत आहेत त्या घोळक्यात शिरणे. सिंधूताई हटकून सापडतील.

कोणाचाही वाढदिवस असो, डोहाळे जेवण असो वा इतर आनंदाचे प्रसंग असोत, सिंधुताई आणि तिच्या सुविद्य भगिनी शकू आणि सरला स्वत: गाणी म्हणत. इतकेच नव्हे तर त्या गाण्यावर तालबद्ध नाचून तो प्रसंग सर्वानाच अविस्मरणीय करून ठेवीत. एकदा चेंबूर गोल्फ क्लबमध्ये, एकाच हॉलमध्ये, दोन पार्ट्या होत्या. आमच्या पार्टीमध्ये या तीन भगिनींचे नाचगाणे चालू होते तर दुसऱ्या पार्टीचे प्रोफेशनल फोटोग्राफर्स, तसेच त्यांचे अमंत्रित लोक ती पार्टी सोडून इथे video चित्रीत करत होते.

कोणाचेही कौतुक करताना सिंधूताई जरासुद्धा काटकसर करत नसे. माझ्या आईने एकदा तिला सहज विचारले आज जेवायला काय केले आहे? तर प्रफुल्लीत चेहऱ्याने सिंधूताई म्हणाली – ''घमघमीत डाळी आंबट आणि वेलणकराली बटाट्या भाजी असो मस्त प्रोग्राम आसा!'' ऐकणाऱ्या सर्वांच्या तोंडाला पाणी सुटले. मी विचार करत होतो – जेवण तर फक्त डाळीची आमटी आणि बटाट्याची भाजी! मग जणू ५६ भोग बनविल्यासारखे सगळ्यांचे चेहरे का? मीही तिला एकदा विचारले की काय ब्रेकफास्ट केला – तर मला सांगते – अरुण! एक छान ब्रेडस्लाईस घेतला – ब्रिटानियाचा हं! नंतर त्याला मस्तपैकी अमूलचे ताजेताजे बटर लावले. (मला वाटते तिने अमूलचा डबा नुकताच उघडला असावा म्हणून ताजे ताजे) व तो चहात बुडवून खाल्ला! माझ्या तोंडालाही पाणी सुटले होते व एक विचारही मनात आला – किती नशीबवान लोक! किती छान ब्रेकफास्ट खातात नाहीतर आम्ही – फक्त दोन अंड्यांचे आमलेट आणि पॉरिज!

**पैलू नं. चार :– अजात शत्रू –**

मी माझ्या सबंध आयुष्यात सिंधूताईंकडून कोणाची निंदा, साधी तक्रारसुद्धा ऐकली नाही. मी जर कोणावर टीका केली तर मला सुद्धा ती मध्येच थांबवत असे. मी एकदा तिला म्हणालो की, ओसामा बिन लादेनसारखा नीच माणूस जगात नाही, तर मला मध्येच थांबवून ती म्हणाली – ''असे कोणाबद्दलही वाईट म्हणू नये. ओसामाची सुद्धा काही कारणे आणि अडचणी असतील – ज्या आपल्याला माहीत नाहीत – म्हणून तो असा वागत असेल. कोणीही माणूस जन्मत: वाईट असत नाही, तो परिस्थितीने वाईट बनतो.''

**पैलू नं. पाच :– मंगेश–शांतादुर्गावर संपूर्ण श्रद्धा आणि विश्वास –**

घरी कोणीही आजारी असेल तरी सिंधूताई अगदी निश्चिंत! तिला खात्री असे की मंगेश–शांतादुर्गा तिच्या पाठीशी आहेत आणि हे दैवत तिची पूर्ण काळजी घेईल. तिला पाच

वर्षांपूर्वी पॅरेलीसीसचा ॲटेक आला होता, तेव्हा स्वत: घाबरणे तर दूरच पण आपल्या नर्व्हस पुत्राला जो M.D. डॉक्टर आहे त्याला धीर देत समजाविले की माझे दैवत माझ्या पाठीशी आहेत व मी यातून लवकरच बाहेर पडीन. माझ्या स्वप्नात येऊन मला त्यांनी तसे आश्वासन दिले आहे व त्याप्रमाणे ती लवकरच बरी पण झाली.

**पैलू नं. सहा :– जगच माझे मित्र –**

एखादा माणूस स्वभावाने कसा असावा हे ओळखणे फारसे कठीण नाही. त्याच्या चेहऱ्यावरील हावभावच त्याच्या मनात काय चालले आहे ते दाखवतात. तुमच्या मनात जर इतरांविषयी प्रेम असेल तर तुमचा सात्त्विक चेहरा, तुमचे हसरे डोळेच ते व्यक्त करतात. तुम्हाला ते मुद्दाम सांगण्याची गरजच नाही. रोज भेटणारे मित्रच असतील असे शक्य नाही. तसेच क्वचित भेटणारे अगदी थोड्यावेळाकरिता जरी भेटले तरी अगदी जवळचेच वाटतात. माझी सिंधूताई अगदी अशीच होती.

एकदा मंगेशी देवळाच्या पायथ्याशी सिंधूताईंना आशा भोसले आणि उषा मंगेशकर अचानक दिसल्या. त्यांचे संभाषण –

सिंधूताई : अय्या! तुम्ही कधी आलात?

आशाताई : आम्हाला गोव्याला येऊन दोन दिवस झाले.

सिंधूताई : छान! आता किती दिवस मुक्काऽऽम?

आशाताई : चार दिवस. येत्या सोमवारी परत जाणार.

सिंधूताई : (आशाताईचा हात धरून) मज्जा करां हां!

ज्या प्रफुल्लीत चेहऱ्याने सिंधूताईंनी वरील वार्तालाप आशाताईंशी केला – मला खात्री आहे! आशाताई मनात विचार करत असतील की आपण या बाईला नेमके कुठे भेटलो होतो! व आजुबाजूच्या लोकांची खात्री पटली असेल की सिंधूताई आशाताईंची शाळेतली वर्गमैत्रीण असावी. खरेतर सिंधूताई आशाताईंना पहिल्यांदाच भेटल्या होत्या.

**पैलू नं. सात :– मातृपितृ प्रेम –**

स्वत:ची आई कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाने आजारी असताना सिंधूताईने चिअरीव्ह्यूमध्ये राहून अगदी शेवटपर्यंत त्यांची नर्स, स्वयंपाकीण, जमादारीण वगैरे सर्व रूपात सेवा केली व आईचे निधन झाल्यावर एकट्या पडलेल्या वडिलांची काळजी घेण्याकरिता स्वत:चे घर सोडून मुलांना व पतीला पण तेथेच बोलावले व शेवटपर्यंत वडिलांची काळजी घेतली. त्यांना एकटेपणा अजिबात



जाणवू दिला नाही व त्यांचे बाकीचे जीवन अगदी सुसह्य आणि आरामात गेले. एखादा आज्ञाधारक मुलगा सुद्धा एवढे करणे कठीण!

**पैलू नं. आठ – नोकरांबद्दलसुध्दा कणव**


सिंधूताईंकडे जवळजवळ २०–२५ वर्षे घरकाम केलेला एक नोकर होता. त्याचे नाव सोनू. थोडासा बावळट पण अतिशय इमानदार आणि सिंधूताईंना आईसमान मानणारा. सोनूला रस्ता क्रॉस करताना एका वाहनाने उडवले आणि त्याचा मृत्यू झाला. त्याच्यामागे निराधार बायको आणि ३ मुले होती. सिंधूताईंनी सोनूच्या मृत्यूनंतरही त्याच्या मुलांची आबाळ होऊ नये म्हणून त्याचा पगार अनेक वर्षे चालू ठेवला व जेव्हा सोनूचा मोठा मुलगा नोकरीला लागला तेव्हा सोनूच्या नावाने फिक्स्ड डिपॉझिट रूपाने ठेवलेली इतर रक्कम त्याच्या हाती सुपूर्द केली. अजूनही तिन्ही मुले सिंधूताईला भेटायला येत असत.

अशी माझी सिंधूताई – जीवनात आनंद शोधणारी! आनंद निर्माण करणारी!! आणि आनंद जगणारी!!! सर्वांना हसतमुख चेहऱ्याने मदत करणारी, स्वत:च्या जीवनाचे पूर्णपणे सार्थक करून निजधामास गेली. तिला शतश: प्रणाम!

**– अरुण भास्कर कसबेकर**

९८२०२९१३६५/८७७९९८६६०६

II Shri Shantadurga Prasanna II



**Arun Kasbekar turns 80 on 24th June**

Happy Birthday Dearest Arun / Pappa / Opa (Grandfather)

***With Love,***

Prabha, Atul, Leena, Preeti, Sarika, Vandana, Jay, Nathan, Fabian, Arnav, Naomi, Adrian, Maya, Armaan, Yanik & Anushka.

# मंगलाताई वागळे : एक धडाडीचे व्यक्तिमत्व

काही माणसे समाजसेवेचे व्रत घेऊनच जन्म घेतात. मंगलाताई वागळे यांपैकीच एक होत्या. त्यांचे जीवनपर्व अस्तास गेल्याची दुःखद बातमी सकाळीच कानावर आली आणि मन सुन्न झाले. आपल्या धडाकेबाज कार्यातूनच त्यांनी एक कर्तबगार समाजसेविका अशी आपली प्रतिमा उभी केली. गोमंतकाच्या स्वातंत्र्यलढ्याचे उद्गाते डॉ. पुंडलीक गायतोंडे यांच्या त्या धाकट्या भगिनी. रक्तातूनच धडाडीही हा गुण अंगात भिनलेला आणि १७ व्या वर्षीच कारवारच्या वागळ्यांची स्नुषा झाल्यानंतर सासरेबुवांच्या कर्तबगारीचा आदर्श डोळ्यासमोर राहिलेला.

मंगलाताई आणि माझी आई काणकोणच्या माहेरवाशिणी आणि कारवारच्या सासुरवाशिणी. दोन्ही मैत्रिणी असल्यामुळे मंगलाताई मुंबईहून कारवारला सासरी आल्या की मैत्रिणींची गळाभेट ही चुकायची नाही. त्यात दोघांचे सासरे रा.ब. गणपतराव तेलंग आणि रावसाहेब नारायणराव वागळे हे एकमेकांचे परममित्र. त्यामुळे त्यांचा आमचा घरोबा होता. मी त्यावेळेला खूप लहान होते. त्यांचे तारुण्यातले ते सौंदर्य माझ्या बालचक्षूंनी जे टिपले होते ते कधीच विस्मरणात गेले नाही. माझ्या विवाहानंतर मी गोव्यात आल्यानंतर बऱ्याच वर्षानंतर कला अकादमीमध्ये त्यांना मी पाहिले. त्या मला ओळखणे शक्यच नव्हते; परंतु मी माझी ओळख दिल्यानंतर आपल्या मैत्रिणीची लेक या नात्याने त्यांनी ज्या मायेने घट्ट पकडले तो स्पर्श मला खूप काही सांगून गेला. त्या गोव्यामधल्या पहिल्या भेटीनंतर त्यांचे सतत फोनवर मला 'यॉ गॉ मीरा एक दिस यॉ गॉ'चा लकडा लागलेला असायचा. त्यामुळे मी त्यांच्या मिरामार, सांतिनेज अशा बदलत्या घरी जाऊन भेट घेऊन आले होते. डिसेंबरच्या २५ तारखेला असेच त्यांच्या आग्रहावरून मी आणि पद्मश्री सुरेश अमोणकर सर सांगोल्डा येथील त्यांच्या कन्येच्या बंगल्यावर जाऊन त्यांच्याबरोबर चांगले दोन तास गप्पा रंगवून आलो होतो. आपल्याला भेटायला आल्याबद्दल त्या हर्षभरित झाल्या होत्या.

माझी आई नेहमी आपल्या या हुषार मैत्रिणीचे कौतुक सांगत असायची. तसेच तिने काळजावर किती दुःखाचे प्रहार झेलले तेही काकुळतीने सांगायची. आपले यजमान, कर्ता सावरता मुलगा, कारगिलच्या युद्धात शहीद झालेला नातू यांच्या अकाली झालेल्या निधनाचे दुःख कुरवाळत न बसता त्यांनी दीनदुबळ्यांचे दुःख कमी करायचा वसाच घेतला. याची साक्ष 'हमारा स्कूल' आणि काणकोणच्या कष्टकरी महिलांना उपलब्ध करून दिलेला रोजगारच देतात. मुंबईला यजमानांचा फिशरिजचा धंदा डबघाईत गेल्यावर मंगलाताईंनी जी कंबर कसली त्याला तोड नाही. सकाळी ५ वाजता उठून मोठमोठी हॉटेल्स, कंपन्या यांना भेट देऊन शेकडो किलो माशांचा व्यवहार त्यांनी सुरू केला. टेंडर पद्धतीने सर्व कॉन्ट्रॅक्ट्स घेण्यासाठी या एकट्या बाईने मार्केटचा सर्व्हे केला. बड्या कंपन्या व मोठमोठ्या इंडस्ट्रीयल कॅन्टीन्सना या एकट्या बाई मत्स्यपुरवठा स्वतः जाऊन करत. पुढे गोमंतकात परतल्यावर त्यांनी समाजकार्यात स्वतःला कसे झोकून दिले हे सर्व गोमंतकीयांना ज्ञात आहेच.



समाजकार्य करण्यासोबत त्यांनी आपली रसिकताही जपली. प्रचंड उत्साही आणि परोपकारी. त्या नव्वदीत होत्या हे कुणालाही खरे वाटण्याजोगे नव्हते. त्यांच्या सांतिनेजच्या घरी गेल्यावेळी त्यांनी स्वहस्ते बनविलेल्या लुसलुशीत मऊसूत पुरणपोळ्या घरी बनविण्याचा व्याप कधीच सोडून दिलेल्या मला खरोखर लाजवून गेल्या. मिरामारला गेल्यावेळी त्या मला म्हणाल्या, 'मीरा तू टॉप घालतेस का गं?' मी तुला देते. त्यांनी त्यावेळी गळ्यापासून हाताच्या कोपरापर्यंत फ्रील असलेला सुंदर गुलाबी रंगाचा पायघोळ झगा घातलेला होता. त्या मला युरोपियन राणीच भासल्या. आधुनिक राहणीमान, विचारसरणी याकडे त्यांचा कल असे. त्यांच्यामधला उदंड उत्साह, उमेद, खरोखरच वाखाणण्याजोगी होती. त्यांना 'इकेबाना'ही अवगत होता. शास्त्रीय संगीतातले काही कळत नसले तरी ऐकायला खूप आवडायचे. रघुनंदन पणशीकर आणि देवकी पंडित यांच्या गायनाच्या कार्यक्रमाला त्या आवर्जून हजर होत्या. मला खरोखरच प्रश्न पडला की, मंगलाताईच्या कोणत्या गुणाला सलाम करू? उदंड उत्साहाला, गाढ विश्वासाला, निग्रही बाण्याला, निस्सीम निर्भीडतेला, धडाकेबाज धडाडीला, मनाच्या बळकटीला, कलागुणांना, पाककलेला, रसिकतेला की त्यांच्या काळजात काठोकाठ भरलेल्या सहृदयतेला?

आज 'हमारा स्कूल'ची मुले या बडी टिचरला पारखी झाली; परंतु 'हमारा स्कूल'चा त्यांनी उभा केलेला डोलारा चिरंतनपणे गोमंतकीयांना त्यांची 'याद' देत राहील. ईश्वर त्यांच्या पुण्यात्म्यास शांती देवो.

**– मीरा प्रभुवेर्लेकर**, म्हापसा

(पणजी येथील एक ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती मंगला सर्वोत्तम वागळे यांचे वैशिष्ट्यपूर्ण कार्य म्हणजे त्या माशाच्या व्यवसायामुळे भल्या पहाटे फिश मार्केटमध्ये जायच्या, तेथे रोज बरीच लहान सहान मुले मासे चोरताना दिसायचा. नंतर कोळीणींचा आरडाओरडा, खेकसणे, मारणे हे दृश्य त्यांना रोजचेच झाले होते. हे बघून त्या दुःखी व्हायच्या. त्यांनी ठरविले की त्या मुलांना रीतसर शाळेत पाठविण्याशिवाय पर्याय नाही. नंतर संबंधितांशी संपर्क साधून त्यांनी मार्केटमध्येच एक कोपरा घेऊन साक्षरता वर्ग सुरू केला. शिक्षणाशिवाय या कृश मुलांना सकस आहारही द्यावा हा विचार त्यांच्या मनात घोळू लागला. त्यांचे भाचे श्री मोहन तेलंग यांनी दोन लाख रुपयांची उत्स्फूर्त व उदार देणगी देऊन मंगलाताईंची आर्थिक विवंचना दूर केली. नंतर त्यांनी वसतीगृहही सुरू केले. तेथील मुले ८० ते ९० टक्के गुण मिळवितात. मुंबईच्या जर्मन कॉन्सुलेटचे काही अधिकारी यांनी मंगलाताईंच्या स्तुत्य उपक्रमाची पहाणी केली व त्यांच्या समाजकार्याची दखल घेऊन चार लाख रुपयांचे अनुदान दिले. अशा या पुण्यस्त्रीचे २७ एप्रिल रोजी निधन झाले. मंगलाताईंबद्दल मीरा तेलंग प्रभुवेर्लेकर यांनी स्थानिक 'लोकमत' या दैनिकांत लिहिलेला लेख वर उद्धृत केला आहे.)

## माझे प्रिय बाबा – श्री शशिकांत नाडकर्णी

आपण वयाने कितीही मोठे झालो तरी आईवडिलांचा पाठीवरचा हात हा आपल्याकरता नेहमीच मायेचा आधार असतो. दुर्दैवाने नुकतेच माझ्या वडिलांचे म्हणजे श्री. शशिकांत महारुद्र नाडकर्णी यांचे निधन झाल्यामुळे माझा एक मोठा आधार मी गमावला आहे.

कुशाग्र बुद्धिमत्ता, दिलदार स्वभाव आणि उमद्या व्यक्तिमत्त्वाचे माझे बाबा, व्यवसायाने सिव्हील इंजिनियर होते. भारतातल्या अनेक शहरात त्यांनी बांधलेल्या वास्तू आजही दिमाखात उभ्या आहेत. पुण्यातील 'हॉटेल ब्लू डायमंड', गोव्यातील 'हॉटेल मांडवी', सुरतेचे 'टेक्स्टाईल मार्केट' अशी अनेक उदाहरणे देता येतील. सुरतेच्या टेक्स्टाईल मार्केटमधील फिरते उपहारगृह हे भारतातील पहिले फिरते उपहारगृह आहे आणि ते बांधण्याचे श्रेय माझ्या बाबांना जाते. वक्तशीरपणा, तर्कशुद्ध विचार आणि आपले म्हणणे दुसऱ्यांना संयमाने पटवून देण्याची हातोटी यामुळे देशीच नव्हे तर परदेशी व्यवसायबंधूंशीही त्यांचे सौहार्दाचे संबंध होते.

कारवारहून मुंबईला आल्यावर बाबांनी बालमोहन विद्यामंदिरमध्ये इयत्ता चौथीत प्रवेश घेतला. त्या काळी चौथी आणि सातवीच्या स्कॉलरशिप परीक्षेत फक्त (ब्राह्मण विद्यार्थ्यात) प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या एकाच विद्यार्थ्याला स्कॉलरशिप मिळत असे. मला अतिशय अभिमानाने नमूद करावेसे वाटते की माझ्या बाबांना दोन्ही वेळा स्कॉलरशिप मिळाली होती. शाळेचे प्रिन्सिपॉल दादासाहेब रेगे यांचे ते लाडके विद्यार्थी होते. त्यांच्याच आग्रहामुळे बाबांनी बालमोहनचे प्रथम विश्वस्त व नंतर विश्वस्तप्रमुख म्हणून अनेक वर्षे धुरा सांभाळली.

बाबांचा वाचनाचा व्यासंग दांडगा होता. ज्ञानेश्वरी, वास्तव रामायण, दासबोध यांचा त्यांनी अभ्यास केला होता. कुसुमाग्रज, बहिणाबाई, पुलं यांच्यावर त्यांचे विशेष प्रेम होते. पण खगोलशास्त्रासारख्या क्लिष्ट विषयापासून गुप्तहेरांच्या चातुर्यकथांपर्यंत कोणताही विषय त्यांना वर्ज्य नव्हता. माझ्या आईच्या लिखाणाचे पहिले वाचक आणि टीकाकार बाबाच असत. त्यांना चित्रकलेतही गती होती आणि संगीताचीही उत्तम जाण होती. पर्यटन हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. प्रथम कामानिमित्त व नंतर आवड म्हणून त्यांनी खूप भ्रमंती केली. नातेवाईकांच्या गोतावळ्यात ते मनापासून रमत. माझ्या आणि माझ्या



भावाच्याच नव्हे तर आमच्या चुलत, आते, मावस भावंडांच्या बालपणीच्या आठवणीत बााबंचं स्थान खूप वरचं आहे. त्यांनी सांगितलेल्या गोष्टी, त्यांच्याबरोबरची भटकंती, त्यांनी दिलेला प्रत्येकाच्या आवडीचा खाऊ यामुळे ते आमच्या पिढीत जसे मुलांना प्रिय होते तसेच त्यांच्या नातवंडांचेही ते 'कूल डूड' होते.

आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग बाबांनी अनेकदा निरपेक्षपणे केला. त्यांचं कुलदैवत असलेल्या श्रीमंगेशी देवस्थानचं ७०-८० च्या दशकातलं नूतनीकरण त्यांनी विनामोबदला केलं. ते रहात असलेल्या शांतीनगरमध्ये आवश्यक तेव्हा स्थापत्यविषयक सल्ला देण्याचं काम त्यांनी नेहमीच केलं. तळेगावला 'रामभाऊ परुळेकर विद्या निकेतन' बांधून दादा रेगेंच्या मनातली शाळा मूर्त स्वरूपात आणण्यास त्यांनी मदत केली. एक वेगळीच पण उल्लेखनीय गोष्ट म्हणजे श्री दत्तात्रय नाडकर्णी यांच्या कल्पनेतून साकार झालेल्या 'ऋणानुबंध कारवारचे' या माहितीपटाकरता त्यांनी निवेदनही केलं होतं.

एक आदर्श पुत्र, भाऊ, पती, पिता आणि या अनुषंगाने येणाऱ्या सर्वच भूमिका त्यांनी उत्तमरीत्या पार पाडल्या. गेली काही वर्षे प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांच्या हालचालींवर निर्बंध आले होते. तरीही न कुरकुरता, छोट्या छोट्या गोष्टीत आनंद शोधण्याची त्यांची सकारात्मक वृत्ती कायम होती.

आयुष्यात सर्वात महत्त्वाचे असलेले आंतरिक समाधान कसे मिळवावे याचा वास्तुपाठ देणाऱ्या माझ्या फ्रेंड फिलॉसॉफर बाबांना माझी श्रद्धांजली!!!

**– सौ. सुजाता केणी**

## श्रद्धांजली

**कै. सावित्रीबाई (कावेरी) नागेश नाडकर्णी (सांवरपै)**

३३ वे पुण्यस्मरण – निधन : रविवार२८ जुलै १९८५

तुझ्या प्रेमळ आठवणीशिवाय गेल्या ३३ वर्षात एकही दिवस गेला नाही. श्रीमंगेश तुझ्या आत्म्यास शांती देवो. तुझा आशीर्वाद आमच्या पाठीशी अखंड राहो. तुझ्या स्मृतीस सादर प्रणाम.

**कै. विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी**
**यांच्या तर्फे**

## निधन

| | | |
|---|---|---|
| विमल यशवंत बोरकर | (चेंडिये) | गिरगांव |
| मंजिरी राम बोरकर(पूर्वाश्रमीच्या मंजिरी अविनाश बोरकर) | (कारवार) | विरार |
| अपर्णा वामन बोरकर | (कडवाड) | अंधेरी |
| मनोज महादेव बोरकर | (कडवाड) | हाजीअली |
| संगीता सुधीर देसाई (पूर्वाश्रमीच्या संगीता वामन बोारकर) | (कडवाड) | माहीम |
| शीला राया गुडे (पूर्वाश्रमीच्या शीला नारायण (नानी) पालेकर) | (बिणगे) | सांताक्रुज |
| सुशीला मधुसूदन गायतोंडे (पूर्वाश्रमीच्या सुशीला यशवंत नाडकर्णी) | (सांवरपै) | चेंबूर |
| निर्मला मधुसूदन कसबेकर | (खारगे) | मरोळ |
| मोहिनी (इंदू) सुरेन्द्र कुलकर्णी | (हळगे) | माहीम |
| विमल भास्कर कुलकर्णी | (हळगे) | वांद्रे |
| विद्या गणपत लाड (पूर्वाश्रमीच्या नलिनी रामराव नाडकर्णी) | (बसुणगे) | अमेरिका |
| शुभांगी गोविंद मुझुमदार | (अंकोला) | जोगेश्वरी |
| नारायण मर्तोबा मुझुमदार | (अंकोला) | अंधेरी |
| शशिकांत महारुद्र नाडकर्णी | (सांवरपै) | माहीम |
| जयंत गणपत नाडकर्णी | (अगळी) | पुणे |
| मुक्ता काशिनाथ नाडकर्णी | (अगळी) | वांद्रे |
| जयश्री कमलाकर नायक (पूर्वाश्रमीच्या जयश्री गोविंद मुझुमदार) | (अंकोला) | दहिसर |
| मंगेश शामराव पिंगे | (कणसगिरी) | बोरीवली |
| स्नेहलता (सिंधू) मारुती तेलंग | (केरवडी) | वडाळा |
| मधुकर महाबळेश्वर तेलंग | (बाड) | जोगेश्वरी |
| सुनीती शशिकांत तिळवे(पूर्वाश्रमीच्या सुनीती चिदंबर देसाई) | (हन्नळ्ळी) | माहीम |
| इंदुप्रभा माधव वागळे | (माजाळी) | पुणे |
| *अतुलकुमार शांताराम वागळे | (बाड) | परळ |
| मंगला सर्वोत्तम वागळे | (हाणकोण) | पणजी |
| दिनेश आनंद वागळे | (बाड) | पारले |
| चंद्रकांत सीताराम वागळे | (माजाळी) | बोरीवली |
| प्रकाश कमलाकर वागळे | (माजाळी) | अंधेरी |

*** अतुलकुमार वागळे यांनी देहदान केले आहे.**



## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

### उल्लेखनीय देणग्या

**कै. उमेश भेंडे यांच्या इच्छेनुसार संघास मागे मिळालेल्या विक्रमी देणगींत आणखी ६०,४४,४१९ रुपयांची भर.**

मुखपत्रिकेच्या जानेवारी अंकात स्वर्गीय उमेश शांताराम भेंडे यांच्या इच्छेनुसार त्यांच्या मिळकतीतून बंधू डॉ. किशोर यांच्यामार्फत मिळालेल्या ५७,५०,००० रुपयांच्या विक्रमी देणगीचा तपशील देण्यात आला होता. त्या तपशीलांत नमूद केल्याप्रमाणे डॉ. भेंडे यांनी अलीकडेच उर्वरीत ६०,४४,४१९ रुपयांची भर घातली आहे. त्यांतील ४५,३३,००० रुपये समाज सेवा निधीसाठी आहेत व उरलेले १५,११,४१९ रुपयो वैद्यकीय निधीसाठी आहेत. या भरघोस देणगीमुळे संघाच्या सुमारे साठ लाभार्थी कुटुंबाना मिळणाऱ्या मासिक साहाय्यात आणखी लक्षणीय वाढ करणे शक्य झाले आहे. कै. उमेश भेंडेकडून मिळालेल्या दोन्ही देणग्यांची रक्कम १ कोटी, १७ लाख, ९४ हजार ४१९ रुपये एवढी आहे.

**श्रीमती ज्योत्स्ना वागळे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृद्धसेवानिधीसाठी दोन लाख रुपयांची देणगी**

श्रीमती ज्योत्स्ना दुर्गादास वागळे यांचे मे २०१७ मध्ये खार येथील एका नर्सिंग होममध्ये वयाच्या ९५ व्या वर्षी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांनी आपले देहदान केले होते. त्या माहेरच्या पूर्णा महाबळेश्वर वर्टी (बाड). उमदा स्वभाव, हसतमुख चेहरा व सकारात्मक दृष्टिकोन यामुळे त्या पूर्णामावशी म्हणून नातेवाईकांत लोकप्रिय होत्या. उतारवयातही त्यांचे वाचन दांडगे असायचे. त्या वृत्तपत्रेही सखोल वाचत व ज्वलंत विषयावर संबंधितांशी चर्चा करीत. त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांच्याच इच्छेनुसार लाडक्या पूर्णामावशीच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृद्ध सेवा निधीसाठी दोन लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री प्रकाश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांची देणगी**

गेल्या पिढीतले श्री घनश्याम (शुकनाथ) नीलकंठ नाडकर्णी यांचे गिरगांवात 'सुखनिवास' नावाचे उत्तम 'बोर्डींग-लॉजिंग' होते. तेथील सौजन्याच्या वागणुकीमुळे ते लोकप्रिय होते. ख्यातनाम साहित्यीक राम गणेश गडकरी मुंबईत आल्यावेळी तेथेच मुक्कामाला असत. कालांतराने 'सुखनिवास' हे बंद करून त्यांनी 'वेलकम फार्मसी' हे औषधाचे दुकान सुरू केले. दादर येथे राहणारे त्यांचे चिरंजीव श्री. प्रकाश नाडकर्णी यांचे २०१३ साली निधन झाले. त्यांची आठवण म्हणून त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती शर्मिला यांनी अलीकडेच एक लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील पन्नास हजार रुपये वैद्यकीय निधीसाठी आहेत व उर्वरित पन्नास हजार रुपये वृद्धसेवा निधीसाठी आहेत.

**श्रीमती स्नेहलता (सिंधू) तेलंग यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ श्री. अरुण कसबेकर यांच्याकडून एक लाख रुपयांची देणगी**

दादर येथे राहणाऱ्या श्रीमती स्नेहलता मारुती तेलंग, पूर्वाश्रमीच्या सिंधू मंगेश (काशा) गंडभीर यांचे अलीकडेच २४ मे रोजी दुःखद निधन झाले. कुटुंबवत्सल, सुस्वभावी व हसतमुख अशी त्यांची प्रतिमा होती. आपल्या संघाचे हितचिंतक व देणगीदार श्री. अरुण भास्कर कसबेकर यांच्या त्या आतेबहीण. उभयतांचा एकमेकांवर विलक्षण लोभ होता. श्री. कसबेकर यांनी आपल्या बहिणीस श्रद्धांजली देण्यासाठी लिहिलेला एक हृदयस्पर्शी लेख याच अंकात अन्यत्र प्रसिद्ध केला आहे. श्री. कसबेकर यांनी नुकतीच बहिणीच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृद्ध सेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

श्री. कसबेकर यांची गेल्या बारा वर्षांतली ही एकविसावी देणगी आहे व त्यांनी वृद्धसेवानिधीसाठी दिलेल्या देणग्यांची एकूण रक्कम ३४ लाख ५० हजार रुपयांहून अधिक आहे.

**श्री. मंगेश शामराव पिंगे यांच्या स्मरणार्थ**
**वृद्धसेवा निधीसाठी एक लाख एक रुपयांची देणगी**

बोरीवली येथे राहणारे ज्ञातीचे एक हितचिंतक श्री. मंगेश शामराव पिंगे यांचे २१ डिसेंबर २०१७ रोजी दुःखद निधन झाले. गेली कित्येक वर्षे ते आपले आईवडील श्रीमती प्रमिला व श्री. शामराव मंगेश पिंगे यांच्या स्मरणार्थ सातत्याने संघाला देणग्या देत असत. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी श्रीमती अपर्णा पिंगे यांनी पतीच्याच इच्छेनुसार त्यांच्या स्मरणार्थ वृद्धसेवा निधीसाठी एक लाख व एक रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त**
**एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी**

माहीम येथे राहणारे श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी हे ज्ञातीचे हितचिंतक होते. त्यांनी संघाला तीन वेळा एकेक लाख रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. शिवाय त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थही त्यांच्या आप्तेष्टांकडून काही देणग्या मिळालेल्या आहेत. जानेवारी २०१३ मध्ये वयाच्या ९४ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. १५ फेब्रुवारी १९१८ हा त्यांचा जन्म शताब्दी दिन. त्या प्रसंगी त्यांचे पुत्र श्री. शिवानंद यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीस एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री. दिनेश वागळे यांच्या स्मरणार्थ वृद्धसेवा**
**निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी**

पारले येथे राहणारे श्री. दिनेश आनंद वागळे यांचे ३ एप्रिल रोजी अचानक निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पत्नी श्रीमती रंजना व पुत्र शिवानंद यांनी वृद्धसेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.



**संघास मिळालेल्या देणग्या**

| | | |
|---|---|---|
| १ | श्री अनंत केशव तेलंग यांजकडून | ५०,००० |
| २ | श्रीमती इंदूप्रभा व श्री. माधव महेश्वर वागळे यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री प्रसाद यांजकडून | ५,००१ |
| ३ | श्री गोविंद रुद्रा बोरकर यांच्या स्मरणार्थ नातु श्री. मिलींद दिनकर बोरकर यांजकडून | १,००१ |
| ४ | श्री सच्चिदानंद नागेश नाडकर्णी यांच्या २२ व्या पुण्यतिथी निमित्त नाती श्रीमती सुदीप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| ५ | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ९ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलाकडून | १,००१ |
| ६ | श्रीमती नीना (सुमन) दिगंबर कसबेकर यांच्या १७ व्या पुण्यतिथी निमित्त पती श्री. दिगंबर मारुती कसबेकर व कन्या श्रीमती संध्या व सुजाता यांजकडून | १,००१ |
| ७ | श्री अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती शामला यांजकडून | ५,००१ |
| ८ | श्री शशिकांत विनायक नाडकर्णी यांच्यातर्फे १) पुणे शहरातील रास्ता पेठ येथील सन १९४० नंतरच्या वास्तव्यात आप्तांना आणि कारवारी समाजबांधवांना घरी निवारा, मदतीचा हात देणाऱ्या होन्नेकरी, अंकोला येथील वडिलोपार्जित वारसा हक्काचे घर-आंगण दोन धाकट्या बंधूंच्या सहमतीने आपल्या हयातीतच सहमतीने कॅनरा ब्रदरहूडच्या सामाजिक संस्थेला दान देणाऱ्या कारवारी समाजाचे VT आणि आपल्या कुटुंबाचे अण्णा स्वर्गवासी वडील विनायक त्रिंबक नाडकर्णी यांच्या पुण्यस्मृतीप्रीत्यर्थ | ५,००१ |
| | २) आठवड्यात लाल पेन्सीलीने सफेद कागदावर श्री राम जयराम जय जय राम, लिहून दहा सोमवारी शंकराचे देऊळ आणि गुरुवारी रास्तेवाड्यातील दत्तात्रयांचे देऊळाला नेमाने जाणारी, पै पाहुणे तसेच कुटुंबातील सदस्यांना सतत खाऊ घालण्यात समाधान मानणारी, सिनेमा नियमितपणे बघून आनंद घेणारी कारवारी समाजाची मतन म्हणजे माझी स्वर्गवासी आई उमाबाई विनायक नाडकर्णी यांच्या पुण्यस्मृतीप्रीत्यर्थ | ५,००१ |
| ९ | श्रीमती वृंदा व श्री गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ भाचे सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून | ८,००० |
| १० | श्रीमती वृंदा व श्री गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ भाचे सर्वश्री | |

| | | |
|---|---|---|
| | आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून हळदीकुंकवाच्या खर्चासाठी | २,००० |
| ११ | श्रीमती मुक्ताबाई व श्री काशिनाथ सदाशिवराव वाघ यांच्या स्मरणार्थ सविता सबनीस फाऊंडेशनकडून | ५,००१ |
| १२ | श्रीमती शोभा मंगेश नाडकर्णी यांच्या ६ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री वामन (विकास) यांजकडून | १०,००० |
| १३ | श्रीमती इंदुमती सदानंद नाडकर्णी यांच्या ८६ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | ५,००० |
| १४ | हितचिंतकाकडून | १२,००० |
| १५ | श्रीमती ताराबाई व श्री. शांताराम दत्तात्रय भेंडे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. उमेश यांच्या इच्छेनुसार त्यांच्याच मिळकतीतून बंधु डॉ. किशोर भेंडे यांच्यामार्फत | ४५,३३,००० |
| १६ | आई वडील यांच्या स्मरणार्थ मुलीकडून | ५,००० |
| १७ | श्री. के. वाय. नाडकर्णी ट्रस्टतर्फे | २,००,००० |
| १८ | श्री साईनाथ गोपाळकृष्ण प्रभू यांजकडून | १५,००० |
| १९ | तरूण व प्रिय मित्र श्री. गिरीश काशिनाथ पिंगे यांच्या स्मरणार्थ श्री. सुरेश जमुनाविहार वायंगणकर याजकडून | २५,००१ |
| २० | श्री शांताराम (कालिदास) रामचंद्र बोरकर व श्रीमती मृणालिनी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री शैलेश व स्नुषा श्रीमती अपर्णा यांजकडून | २५,००१ |

### वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १ | श्री गोविंद मारुति कसबेकर यांच्या ७ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री विनय यांजकडून | ३,००० |
| २ | श्री. अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त कन्या व जामात श्रीमती विद्या व श्री. मनोज गोविंद भांडारकर यांजकडून | १०,००१ |
| ३ | श्रीमती शोभा मंगेश नाडकर्णी यांच्या ६ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. वामन (विकास) यांजकडून | १५,००० |
| ४ | श्री प्रकाश घनश्याम नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शर्मिला यांजकडून | ५०,००० |
| ५ | श्रीमती ताराबाई व श्री. शांताराम दत्तात्रय भेंडे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री उमेश शांताराम भेंडे यांच्या इच्छेनुसार त्यांच्याच मिळकतीतून बंधु डॉ. किशोर भेंडे यांच्या मार्फत | १५,११,४१९ |
| ६ | पतीच्या स्मरणार्थ पत्नीकडून | ५,००० |

### वृद्धसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ९ व्या | |



| | | |
|---|---|---|
| | पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| २ | श्री. काशिनाथ त्रिंबक नाडकर्णी त्यांच्या स्मरणार्थ नाडकर्णी कुटुबीयांकडून | १,००१ |
| ३ | श्रीमती शांता (माई) व श्री मंगेश (भाऊ) महेश्वर नेत्रावळी यांच्या विवाहाच्या वर्षदिन प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शुभदा रमेश वागळे यांजकडून | १२,००० |
| ४ | श्रीमती विभा माधव बावकर यांच्या स्मरणार्थ पती श्री माधव श्रीधर बावकर यांजकडून | ५,००० |
| ५ | श्री. दिनेश आनंद वागळे यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रंजना व पुत्र श्री. शिवानंद यांजकडून | ५०,००० |
| ६ | श्रीमती वत्सला (मीराबाय) व श्री. महाबळेश्वर शांताराम कुलकर्णी यांच्या पुण्यतिथी निमित्त पुतणी श्रीमती मृदुला गो. भांडारकर यांजकडून | २,००१ |
| ७ | श्रीमती विमल (वत्सला) व श्री. भालचंद्र अण्णाजी वागळे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. राजन व स्नुषा श्रीमती स्वाती यांजकडून | ५,००० |
| ८ | श्री. सदानंद विश्वेश्वर नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती मंगला यांजकडून | २,००० |
| ९ | लाडक्या पूर्णामावशी (श्रीमती ज्योत्स्ना दुर्गादास वागळे) यांच्या स्मरणार्थ तिच्या पुण्यतिथी निमित्त प्रिय आप्तेष्टांकडून. | २,००,००० |
| १० | श्रीमती विनता विश्वंभर गायतोंडे यांच्या १७ व्या पुण्यतिथीनिमित्त बंधु श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| ११ | श्री. प्रकाश घनश्याम नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शर्मिला यांजकडून | ५०,००० |
| १२ | सासुसासऱ्यांच्या स्मरणार्थ सुनेकडून | ५,००० |
| १३ | श्रीमती स्नेहलता (सिंधू) मारुति तेलंग यांच्या स्मरणार्थ मामेभाऊ श्री. अरुण भास्कर कसबेकर व सौ. प्रभा यांजकडून | १,००,००० |
| १४ | श्रीमती उमाताई विश्वंभर गायतोंडे यांच्या २१ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अरुणकुमार यांजकडून | १०,००० |
| १५ | श्री मंगेश शामराव पिंगे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या इच्छेनुसार पत्नी श्रीमती अपर्णा यांजकडून | २,००,००१ |
| १६ | श्री मधुकर व्यंकटराव नाडकर्णी यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून | २,००१ |

### एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १ | कुमारी दीपाली दामोदर शानभाग यांच्याकडून कृतज्ञतापूर्वक | १०,००० |
| २ | श्री. विठ्ठल वामन नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी | |

| | | |
|---|---|---|
| | श्रीमती सुरेखा यांजकडून | १,००१ |
| ३ | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ९ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ४ | श्री शशिकांत विनायक नाडकर्णी यांच्यातर्फे<br>१) निपुत्रिक असूनसुद्धा आम्हां भावंडांची आईच असलेली पुराणातील 'काणी' तसेच अंकोला कारवारकडच्या 'ग्यादी' सांगून आम्हांला सतत हसत ठेवणारी, ओंवळे-सोंवळे सांभाळून न चुकता सिनेमा पाहून रसग्रहण करणारी, रेडियोवरील कीर्तन तसेच भावसरगम गीतरामायण नेमाने ऐकणारी आणि माझ्या संसाराला वजन देणारी कारवारी समाजाची भिम्याक आमच्या कुटुंबाची आक्का, स्वर्गवासी आत्या उमाबाई महाबळेश्वर कुलकर्णी यांच्या पुण्यस्मृतीप्रीत्यर्थ | ५,००१ |
| | २) सतत हसतमुख, मितभाषी, टापटिपीची साहेबी रहाणी असलेल्या जेमतेम ५८ वर्षे आयुष्य लाभलेल्या, प्रत्येक क्षणाला आम्हां भावंडाच्या शिक्षणाबद्दल प्रगतीबद्दल जागरूक राहून आमच्या सांसारीक जीवनाला मार्गदर्शन करणाऱ्या, मुंबई जवळील वसई, विरार, अलीबाग परिसरात समुद्र किनारी जेथे नार्ल, नुस्ते, शीत उपलब्ध असेल अशा ठिकाणी निवृत्त कारवारकरांची सहकारी वसाहत 'छोटा कारवार' वसवण्याची रम्य कल्पना प्रत्यक्षात न आणता अचानक सोडून गेलेल्या आमच्या कुटुंबाचा दादा स्वर्गवासी ज्येष्ठ बंधू मंगेश विनायक नाडकर्णी यांच्या पुण्यस्मृती प्रीत्यर्थ | ५,००१ |
| ५ | श्रीमती विमल (वत्सला) व श्री भालचंद्र अण्णाजी वागळे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री राजन व स्नुषा श्रीमती स्वाती यांजकडून | ५,००० |
| ६ | श्रीमती ललिता माधव वागळे यांच्या २१ व्या पुण्यतिथीनिमित्त बंधु श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| ७ | श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दी निमित्त पुत्र श्री. शिवानंद यांजकडून | १,००,००० |
| ८ | श्री. माधव दत्तात्रय वर्टी यांच्या १० व्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून | १०,००० |
| ९ | श्रीमती सुनीता सुरेश शहापूरकर यांच्या ४ थ्या पुण्यतिथीनिमित्त बंधु श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| १० | श्री के वाय नाडकर्णी ट्रस्टतर्फे | १,१२,००० |


**ठाणे मंच देणगीदारांची यादी**

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती अपर्णा सदानंद देसाई, ठाणे | ५,००० |



Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

**Technology & Personal Touch go Hand in Hand**




**NKGSB Bank**
**NKGSB Co-op. Bank Ltd.**
(Multi-State Scheduled Bank)
SINCE 1917
100 YEARS of Banking Excellence 1917-2017

**Regd. Address:** Laxmi Sadan, 361, V.P.Road, Girgaum, Mumbai-400 004

Call us: 022 2860 2000 | Email: customercare@nkgsb-bank.com | www.nkgsb-bank.com

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.